
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय ..ભા.વા.....
दा. क्र. २६८९

BVBK-0402689

# डमरू राक्षस झिंदाबाद

धम्माल विनोदी
दोन अंकी बालनाट्य !

सूर्यकांत तावडे



BVBK-0402689

प्रकाशक :

गमभन प्रकाशन,
३७९ शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.
© सूर्यकांत तावडे
२०६ मंगळवार पेठ,
पुणे ४११०११.
मुद्रक
रा. गो. पाटील
ज्ञानेश्वरी प्रेस,
१४५७ शुक्रवार पेठ, पुणे २.
प्रथमावृत्ती : डिसेंबर १९९१
प्रकाशन क्र. १७
सजावट :
ल. म. कडू

सूचना

ह्या बालनाट्यांचे सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन आहेत. बालनाट्याचा प्रयोग सादर करावयाचे झाल्यास तालीम सुरू करण्यापूर्वी, किंवा भाषांतर, रूपांतर अथवा कोणत्याही प्रकारचा उपयोग करण्यापूर्वी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

किंमत १५ रुपये

या पुस्तकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ यांनी अनुदान दिले आहे.



गमभन
प्रकाशन

जिव्हाळ्याचे स्नेही
नाटककार
आयु. भि. शि. शिंदे
(आबा) यांस...

– सूर्यकांत तावडे



'डमरू राक्षस झिंदाबाद' ह्या बालनाट्याचा शुभारंभाचा पहिला प्रयोग पुण्याच्या 'चॉकलेट गँग बाल रंगभूमी पुणे' या संस्थेने दि. २ मे १९८८ रोजी भरतनाट्य मंदिर पुणे, येथे सकाळी १० वाजता सादर केला.

निर्माता – नितिन गायकवाड

दिग्दर्शक – सूर्यकांत तावडे

संगीत – अजय पराड

प्रकाश-योजना – सुरेश पाटोळे

रंगमंच-व्यवस्था – मनोहर साबळे, दिलीप नाईक

ध्वनि-संयोजन – अतुल साळी

रंगभूषा – संजय वाईकर, सुहास गवते

वेषभूषा – शिंदे मेकअप सर्व्हिस

## – कलावंत –

१) ससाजी – सूर्यकांत तावडे

२) मसाजी – विजय गायकवाड

३) चक्रमसिंह महाराज – हरिष साठे

४) जपानी – गणेश माकम

५) रशियन – विजय ओहाळ

६) फ्रेंच – विजू गायकवाड

७) जर्मन – सुनिल कांबळे

८) भविष्यवाला – तुषार वाघमारे

९) प्रधानजी – अजीत गोसावी

१०) राजपुत्र – संदीप तावडे

११) शेठजी – पुंडलिक चलवादी

१२) पहिला शिपाई – भिमराज चलवादी

१३) दुसरा शिपाई – दिपक जावळे

१४) राजकन्या – अनुपमा चतूर, पद्मश्री रजपूत

१५) वैशाली भागवत

# प्रस्तावना

मुलांसाठी नाटक लिहिणं हे एक मोठं अवघड काम आहे. नाटकासाठी योग्य तो विषय शोधण्यापासूनच या अवघडपणाला सुरुवात होते. मुलांवर चांगले संस्कार होतील असा विषय तर हवा, परंतु तो जुनाट नीतीतत्वांचं समर्थन करणारा नको, तर आजच्या व्यावहारिक जगाच्या चौकटीत बसणारा हवा. महत्त्वाचा तर हवा, परंतु मुलांना पेलता येईल इतपतच वजनाचा हवा. मुलांची दिशाभूल करील इतका तो साधा भासणारा (सिंप्लिस्टिक) नको, पण त्यांना कंटाळा येईल इतका गुंतागुंतीचाही नको. बालनाट्यासाठी राजेराण्यांची कथानकं किंवा परीकथा, लोककथा निवडल्या जातात, याचं एक कारण, आजच्या सामाजिक कथानकांपेक्षा त्या दृष्टान्तात्मक कथानकांमधून अवघड विषय सुलभ रीतीनं सांगता येतो, हे आहे.

'डमरू राक्षस झिंदाबाद' या नाटकात श्री. सूर्यकांत तावडे यांनी जंगल-तोड करणारा देवभोळा अंधश्रद्धाळू राजा, आणि त्याच्या विरोधातला वनप्रेमी राक्षस यांच्या गोष्टीतून आजचा एक महत्त्वाचा विषय मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या विषयावर आधारलेली एक रंजक कथा तयार करण्यासाठी अनेकविध पात्रं आणि प्रसंग उभी केलेली आहेत.

मुलांच्या नाटकाची शैली जरी बालप्रेक्षकांना गमतीदार वाटेल अशीच ठेवणं भाग असलं, तरीही नाटकाच्या मांडणीमधे तडजोड करून कधीच चालत नाही. प्रौढांसाठी लिहिलेल्या नाटकांत जशी प्रसंगनिर्मिती हवी, व्यक्तिचित्रण हवं, प्रवेशांचे अंकांचे शेवट चटकदार हवेत. तसंच हे सारं मुलांच्या नाटकातही हवं, त्याच तोडीचं, त्याच प्रगल्भतेचं हवं. मुलांसाठी चांगलं लिहू शकणारा लेखक हा प्रौढांसाठीही चांगलं लिहिणाराच असतो, (प्रौढांचं लिखाण जमत नाही म्हणून कोणी बालवाङ्मयाकडे पाहील तर ते वाङ्मयाला अन्यायकारक आहे.) त्याच प्रमाणे प्रौढांसाठी चांगलं लिहिणाऱ्यांनाही बालकाचे निरागसता, जगावरची श्रद्धा सौंदर्याची आवड आणि टवटवीतपणा इत्यादी गुण असतात. हे सारं लक्षात ठेवूनच मुलांच्या नाटकाचे यशापयश जोखायला हवं.

नाटक या प्रकाराची खरी समज त्यावरील प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया पाहूनच येते. सूर्यकांत तावडेंच्या या नाटकाचे प्रयोग व्हावेत व त्यावरून आडाखे बांधून त्यांनी बालनाट्यांमधे विषय व शैली या दोन्ही दृष्टींनी अधिकाधिक प्रयोग करावेत, ही इच्छा. शेवटी मुलांचं काय किंवा मोठ्यांचं काय नाटक हे दोन्ही अर्थांनी प्रयोग होण्यामुळेच टिकतं आणि वाढतं.

— रत्नाकर मतकरी

# दोन शब्द

एकेकाळी बालरंगभूमी ही संपूर्णपणे जादूई करामतीत गुरफटलेली होती. पऱ्या, चेटकीणी, जादूगार अशा काल्पनिक पात्रांशिवाय बालनाटचाला दुसरे विषयच मिळत नव्हते एखादे काल्पनिक पात्र कथानकामध्ये प्रतिकात्मकदृष्टया आल्यास हरकत नाही. परंतु बालनाटचाचे संपूर्ण कथानकच काल्पनिक आणि स्वप्नाळू असल्यास टीकाकारांना टीकेचा विषय मिळतो. पण अशा बालनाटचांवर टीका का होऊ नये ? मुलांना वास्तवतेपासून दूर नेऊन स्वप्नांच्या जगात कोंडून का म्हणून ठेवायचं ? यामुळे बालरंगभूमीचे ऐतिहासिक; वैज्ञानिक अशा वेगळ्या विषयाकडे मात्र दुर्लक्षच होत गेले आहे.

बालप्रेक्षकांना प्रबोधनपर, विज्ञानावर आधारलेली वास्तवतेपासून दूर न जाणारी कथानके निवडून बालनाटचं सादर करायला हवीत. त्यांना आयुष्याकडे अधिक डोळसपणे बघायला शिकवायला हवं, आपल्या देशाविषयी त्यांच्या मनात स्वाभिमान जागवायला हवा. सामाजिक जाणीवा आत्तापासून त्यांच्या मनात निर्माण करायला हव्यात, त्यांच्या मनात भ्रामक, फसव्या कल्पना निर्माण न करता खऱ्याखुऱ्या सत्य परिस्थितीची जाणीव करून द्यायला हवी, आणि हे बालरंगभूमीच्या माध्यमातून कलात्मक आणि रंजक पद्धतीने त्यांना पचेल, समजेल, उमजेल अशा स्वरूपात सादर केल्यास त्यांच्यापर्यंत सहजपणे पोहोचेल आणि पचेल !

साधारण बालप्रेक्षकांचा वयोगट ५ ते ८ आणि ९ ते ११ असा असतो. पण प्रौढ प्रेक्षकवर्गाप्रमाणे बालप्रेक्षक वर्गाला गृहीत धरता येत नाही. वरील दोन्ही वयोगटांची मुले बालनाटच पाहण्यास आलेली असतात. याशिवाय किशोर वयागटातील मुलांना विसरून कसे चालेल ? ही मुलं अशा आडनिड्या वयोगटात असतात की, ती धड प्रौढांनही मोडत नाहीत आणि धड लहान मुलांच्यातही मोडत नाहीत. तेव्हा या सर्वांचा विचार करून, प्रत्येक गोष्ट पुरेशा स्पष्टपणे, सहजतेने समोर मांडावी लागते. साहजिकच बालनाटच लिहिण्यापासून ते प्रयोग सादर करण्यापर्यंत अधिक अवघड आणि जिकीरीचं काम करावं लागतं आणि तसा प्रयत्न मी ' डमरू राक्षस झिंदाबाद ' या बालनाटचाच्या लिखाणाद्वारे केला आहे. पुण्याची बालनाटच संस्था ' चॉकलेट गँग. रंगभूमीतर्फे या बालनाटचाचे पंचवीसच्यावर प्रयोग झालेत.

' डमरू राक्षस झिंदाबाद ' हे माझं दुसरं बालनाटच आपल्या समोर ठेवताना आनंद वाटताय. या बालनाटचाला खूप मोठ्या लहान-थोरांचा हातभार लागला आहे. त्यांचे ऋण विसरून कसे चालेल ? येथे सर्वांच्या नावाचा उल्लेख

करणे मला योग्य वाटत नाही, कारण एखाद्या हितचिंतकाच्या नावाचा चुकून जरी उल्लेख करण्याचे राहून गेले तर ते अन्यायकारक ठरेल. म्हणून या बालनाट्याला ज्यांचा ज्यांचा हातभार लागला. त्या सर्व लहान-थोर मंडळींचा मी सदैव ऋणी आहे.

पण अगदी वेळात वेळ काढून माझे स्नेही श्री. रत्नाकर मतकरी यांनी बालनाट्याला प्रस्तावना दिली त्यांचे येथे आभार मानलेच पाहिजेत.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'जंतर मंतर छू मंतर' या माझ्या पहिल्या बालनाट्यानंतर 'डमरू राक्षस झिंदाबाद' या बालनाट्यास महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळाने अनुदान देऊन हे बालनाट्य आपल्यापर्यंत पोहोचवण्याचे अवघडातील अवघड काम केल्याबद्दल त्यांचा मी सदैव ऋणी आहे.

'जंतर मंतर छू मंतर' या बालनाट्याचे प्रकाशक श्री ल. म कडू यांनी पुन्हा एकदा प्रकाशनाची जबाबदारी घेऊन 'डमरू राक्षस झिंदाबाद' या बालनाट्याचे आकर्षक मुखपृष्ठ आणि सुबक मांडणी केल्यामुळे पुस्तक अधिक सुंदर झाले आहे. त्याचेही आभार मानणे येथे अगत्याचे आहे.

सूर्यकांत गावडे

ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
२६९९ दिनांक


# डमरू राक्षस झिंदाबाद !

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

(रंगमंचावरील पडदा उघडतो. राजमहालाचे दृश्य. प्रसन्न
वरणात, एका उंच जागेवर चक्रमसिंह महाराज हातात मण्यांची
घेऊन जप करीत बसले आहेत.)

चक्रमसिंह : ओम नमो: शिवाय ... . ओम नमो: शिवाय ......
ओम नमो: शिवाय ...... ओम नमो: शिवाय .....
ओम नमो: शिवाय ... .. ओम नमो: शिवाय .....

(तेवढ्यात उजव्या विंगेतून व डाव्या विंगेतून ससाजी आणि मसाजी या दोन पहारेकऱ्यांचा प्रवेश.)

ससाजी }
मसाजी } : म्हाराजांचा जयजयकार असो !

चक्रमसिंह : ओम नमो: शिवाय ...... ओम नमो: शिवाय .. .



राजा चक्रमसिंह

(चक्रमसिंह महाराज जप करण्यात मग्न आहेत असे पाहून दोघेजण एकमेकांच्या तोंडाकडे पाहतात व पुन्हा खाली वाकून मुजरा घालतात.)

ससाजी }
मसाजी } : म्हाराजांचा जयजयकार असो !

(चक्रमसिंह महाराज समाधी लावल्याप्रमाणे हातात मण्यांची माळ घेऊन जप करण्यात मग्न आहेत असे पाहून दोघे पहारेकरी गप्पा मारण्यास सुरुवात करतात.)

मसाजी : आरं सश्या, म्हाराजांची दातखीळ बसली का काय ? अं ? न्हाय म्हंजी, म्हाराज काहीच बोलत नाहीत म्हून इचारलं....

ससाजी : (मसाजीच्या अंगावर धावून जात, प्रेक्षकांकडे बोट दाखवीत) ये, ये बेटचा ! या सर्व्या लोकांसमोर माझं पूजीशन खराब करतो का काय ? आँ ! नीट बोल, नीट बोल बेटचा. सश्या म्हणण्यापरीस ससाजी म्हणालास तर काय लय अवघड जाईल का ? आँ ?

मसाजी : बरं बाबा, चुकलो. सश्या ··· (दाताखाली जीभ चावत) नाय म्हटलं, ससाजीराव ! काय ससाजीराव, आता तरी खूष ना ?

ससाजी : हां ··· (थाटात) काय म्हणतो माश्या ?

मसाजी : काय रे ये दीडशहाण्या, मी तुला सश्या म्हटल्यालं न्हाय चालत, तुझं पूजीशन खराब होतं न्हाय का ? अन् तू आमाला माश्या म्हणतो तवा ? ते काय न्हाय, मी पण तुला आता सश्याच म्हणणार.

ससाजी : (त्याची समजूत काढत)अरे, तू तर पक्का येडाच हाय बघ. अरे, तुझ्यापक्षा मी दोन महिन्यांनी म्होटा हाय का न्हाय? म्हंजी मी थोरला अन् तू धाकटा. आपल्या आजीनं आपल्याला काय शिकवलं, धाकट्यानी थोरल्या माणसाचा नेहमी आदर ठेवावा, त्यांच्याशी चांगलं बोलावं.

मसाजी : (वैतागून) हा … हा … बास झालं. नको भाषन वाढवू. मी काय म्हणतो ते नीट ऐक. मला वाटतं वैद्यबुवांना बोलावून आणायला पायजे.

ससाजी : का बरं ? काय झालं ?

मसाजी : काय झालं म्हंजी ? (महाराजांकडे बोट दाखवीत) आरं, तिकडं बघ, आपले म्हाराज कसं गोसाव्याचं स्वांग घेऊन शिव शिव करीत वसल्यात, जसा काय दगडाचा पुतळाच वशिवलाय !

ससाजी : ये, शू… ! हळू बोल, हळू बोल. तुला या दरबारात कामाला लावून अजून नीट महिना पण नाही झाला, तवा जरा सावधगिरीनं वाग. आरं, या डमडम नगराचा चक्रमसिंह राजा नावापरमानीच चक्रम हाय. त्यानं जर का आपलं बोलनं ऐकलं तर त्यो चक्रम डोक्याचा राजा दोगांना बी हत्तीच्या पायाखाली तुडवायला सांगीन. समजलं का ?

मसाजी : (रडत) मित्रा, तू मला किती संभाळून घेतो रे ? अन् तूच मला या दरबारात कामाला लावलंय. मित्रा, तुझं माझ्यावर लय लय उपकार हायेत वघ.

ससाजी : (रडत) 'असं रे का बोलतो ? यात कसलं उपकार ? आता मी तुझ्या कामी नाय आलो तर दुसरं कोन येनार ?

मसाजी : (रडू आवरत) मित्रा, तुझे ईच्यार किती चांगलं हायत रे ! तू माझ्या सोबतीला असला की मला लय लय आधार वाटतो वघ. मग तू मला नाय ना कुठं सोडून जानार ?

ससाजी : (रडू आवरत) नाय रे, मी तुला सोडून कुठंच जानार न्हाई. (असे म्हणत दोघे एकमेकांच्या गळ्यात पडून रडतात. पुन्हा एकमेकांपासून वाजूला होतात.)
हा वास करा. चला, आता लागा आपल्या कामाला.

मसाजी : कामाला ? कुठल्या कामाला ?

ससाजी : कुठल्या म्हंजी, बोंबलायच्या…

मसाजी : बोंबलायच्या व्हय, मग हे कवा सांगनार ?

(मसाजी बोंबलू लागतो.)

ससाजी : ये .. ये ... बेट्या ! आरं, हे दिवाळीच्या दिवशी तुला शिमगा कसा आठवला बोंबलायला ! धडधडीत दरबारामधी म्हाराजांसमोर बोंबा मारतो, तो गप्प बसल का ?

मसाजी : आरं, मग तूच म्हणालास मगा की, बोंबलायच्या कामाला जायचं म्हणून.

ससाजी : आरं, बोंबलायच्या म्हंजी आपले म्हाराज जे हुकूम देतील त्या परमानं नगरात जाऊन सर्व्या लोकांना ऐकू जाईल असं मोठ्यानी वरडून सांगायचं. म्हंजी सर्व्या डमडम नगरात दवंडी द्यायची, आलं का डोस्क्यात ?

मसाजी : हा, आलं ध्यानात. चला.

(ससाजी आणि मसाजी दवंडी देण्यास निघतात. तोच समोरून दरबारामधील ज्योतिष पाहणारे पंडितमहाराज येतात. हातात भले मोठे भविष्य बघण्याची कुंडली, डोळ्यांवर चष्मा, डोक्या-वर पगडी, अंगात सदरा व धोतर असा वेश.)

पंडित : शुभ प्रभातम् ... शुभ प्रभातम् ... ! कोठे निघालात एवढ्या गडबडीत ?

मसाजी : तुमच्या बायकुच्या लग्नाला.

पंडित : काय म्हणाला ?

ससाजी–मसाजी : शुभ कामाला निघालो.

मसाजी : शुभ कामाला निघालो आणि तुम्ही मोडा घातलात. (तोंड वाकडे करीत) म्हणे कुठं निघाला गडबडीत ?

ससाजी : म्हाराजांना सांगू का मोडा घातला म्हणून ?

पंडित : (उसने हसत) हीः . . हीः . . हीः . . तसं नाही, तुम्ही गड-बडीत निघाला, वाटलं तुमचे सध्याचे ग्रह फिरून शनिमहाराज मागे लागले की काय ?

मसाजी : अहो, (चक्रमसिंह महाराजांकडे बोट दाखवीत) हे काय शनिमहाराज ! यांनी हुकूम दिलाय, तेव्हा त्यांच्या हुकुमाची अंमलबजावणी करण्यासाठी निघालोय.

पंडित : अरे, पण कोणत्या हुकुमाची अंमलबजावणी करण्यासाठी निघालात ?

ससाजी : पंडितमहाराज, तुम्ही दरबारातले खास मंत्री, ज्योतिष ठावं असणारे आहात. कुंडली पाहून तुम्ही म्हाराजांना पुढचं-मागचं सगळं सांगता. मग बळखा पाहू, आम्ही कोणत्या हुकुमाची अंमलबजावणी करण्यासाठी निघालो.

पंडित : अरे, मी ज्योतिषतज्ञ आहे. महाराजांना सर्व भविष्य सांगतो हेही बरोबर आहे, पण तुमच्या मनातील गोष्ट ओळखायला मी काय मनकवडा आहे ?

मसाजी : नाही...थापाडे आहात.

पंडित : काय म्हणालास ? अरे गाढवांनो, मी चक्रमसिंह महाराजांचा खास मंत्री आहे. माझ्या भविष्यवाणीच्या जोरावर तर महाराजांचा राज्यकारभार चालतोय; म्हणून तर सगळीकडे आबादी-आबाद आहे.

ससाजी : अगदी बरोबर ! पंडितमहाराजांची भविष्यवाणी बोले आणि चक्रमसिंह महाराज हाले ! म्हणूनच डमडम नगरात बरबादीच बरबादी आहे.

पंडित : अगदी बरोबर ! (पुन्हा शुद्धीवर येत) काय म्हणालास ?

मसाजी : त्याचं म्हणणं असं आहे की, या वर्षी आपल्या नगरात पावसाचा एक थेंबही पडला नाही, त्यामुळं सगळीकडे दुष्काळ पडला की नाही ?

पंडित : पडला.

ससाजी : मग मला सांगा, आपल्या नगरात महागाई वाढली की नाही ?

पंडित : वाढली.

मसाजी : आपल्या नगरात गरीबी वाढ्ली की नाही ?

पंडित : वाढली.

सासजी : आपल्या नगरात गैरसोयी वाढल्या की नाही ?

पंडित : वाढल्या.

मसाजी : आपल्या नगरात अंदश्रद्दा वाढल्या का नाही ?

पंडित : वाढल्या.

ससाजी : आपल्या नगरात आबादी आहे की बरबादी ?

पंडित : (सुरुवातीच्या सुरात) बरबादी ! (पुन्हा चुकीचे बोलल्याचे लक्षात येताच गोंधळून जातो.)

मसाजी : आंगं आस्सं ! झालात की नाही शेवटी कबूल ?

ससाजी : तुम्ही फक्त म्हाराजांना खूष ठेवण्याकरिता आणि पैसे मिळविण्यासाठी थापा मारता आणि तुमच्यावर इश्वास ठिवून चक्रमसिह म्हाराज कारभार चालवत्यात.

मसाजी : तुमच्या या खोटारड्या भविष्यवाणीमळे सर्व नगरात बरबादीच बरबादी आहे.

पंडित : काय म्हणालात ? तुमची ही मिजास ! माझ्या भविष्यवाणीला खोटे ठरविता ? (ओरडतो) महाराज, महाराज, धावा...

(एवढा वेळ देवाचे स्मरण करण्यात मग्न असलेले चक्रमसिंह महाराज खाडकन् जागे होतात.)

चक्रमसिंह : ओम नमो: शिवाय .. ओम नमो: शिवाय...

पंडितबुवा, काय झालं ओरडायला ? आमच्या राज्यावर संकट वगैरे कोसळणार आहे का ?

पंडित : नाही महाराज, माझ्यावर संकट कोसळलं आहे. हे दोघे राहू केतू माझ्या मागे शनीप्रमाणे लागले आहेत. म्हणे, मी थापाड्या आहे. माझी भविष्यवाणी खोटी आहे.

चक्रमसिंह : (रागवत) ओम नमो: शिवाय... ओम नमो: शिवाय... काय रे गाढवांनो, तुमची ही हिम्मत ! आमच्या दरबारातील ज्योतिषबुवांचा तुम्ही घोर अपमान करता, त्यांना खोटे ठरवता, याची शिक्षा तुम्हांला दिलीच पाहिजे.

वा. क्र. २६८ ३१।७।८२
विषय ना.वो



पंडित

ससाजी : क्षमा असावी म्हाराज. तुम्ही दिलेल्या हुकुमाची आम्ही अंमलबजावणी करण्यासाठी निघालो तर पंडितमहाराजांनी मोडा घातला.

मसाजी : म्हणूनच आम्ही चिडलो आणि त्यांची जरा चेष्टा केली.

चक्रमसिंह : काय ? चेष्टा केलीत ? पंडित म्हणजे आमच्या दरबारातील एकमेव ज्योतिषतज्ञ, आणि त्यांची चेष्टा करता ? क्षमा मागा त्यांची.

ससाजी–मसाजी : क्षमा असावी पंडित म्हाराज !

पंडित : (थाटात) असो, असो !

चक्रमसिंह : आम्ही दिलेल्या हुकुमाची अंमलबजावणी झाली की नाही ? नसेल झाली तर तावडतोब जा, विलंब लावू नका, सांगितल्याप्रमाणे डमडम नगरात दवंडी पिटवा.

ससाजी–मसाजी : जशी म्हाराजांची आज्ञा ! (दोघे निघून जातात.)

चक्रमसिंह : हं बोला पंडितबुवा, काय म्हणते तुमची कुंडली ? तुम्ही सांगितल्याप्रमाणे आम्ही त्या जंगलात राहणाऱ्या डमरू राक्षसाला ठार मारून तिथे भव्य मंदिर बांधणार.

पंडित : (महाराजांना कुंडली दाखवीत) महाराज, पहा पहा, पंचमातला गुरू व राशीतील मंगळ यामुळे आपल्या कर्तृत्वास अधिक वाव मिळेल. तुम्ही जंगल तोडून, डमरू राक्षसास ठार मारून तिथे भव्य मंदिर बांधल्यानंतर सर्व लोक उत्स्फर्तपणे तुमचे कौतुक करतील. बुध आता षष्ठात आहे. तेव्हा सर्व गोष्टी तुमच्या मनाप्रमाणे घडतील.

चक्रमसिंह : (आनंदात) ओम नमो: शिवाय...ओम नमो: शिवाय ... पंडितबुवा, तुमच्या कुंडलीची पण कमाल आहे. तुम्ही नेहमी आमच्या फायद्याच्या गोष्टी सांगता, आम्ही तुमच्यावर खूष आहोत.

पंडित : महाराज, फायद्याच्या गोष्टी सांगितल्याशिवाय आपल्य राज्याची प्रगती कशी होईल ? शिवाय राज्यातील लोकांनाही वाटले पाहिजे, राजा असावा तर तुमच्यासारखा !

चक्रमसिंह : पंडितबुवा, तुमच्यासारखे विद्वान आणि प्रामाणिक मंत्री आमच्या दरबारात आहेत म्हणूनच हा राज्यकारभार चाललाय. आम्ही तुमच्या कामगिरीवर खूष आहोत. (शिपायाला बोलावतात.) कोण आहे रे तिकडे ?

शिपाई : (प्रवेश करीत) महाराजांचा जयजयकार असो ! आज्ञा असावी महाराज !

चक्रमसिंह : पंडितबुवांना खजिन्यामधून शंभर मोहरा बक्षीस देण्याची व्यवस्था करा.

शिपाई : जशी आपली आज्ञा !

पंडित : महाराजांचा जयजयकार असो !

चक्रमसिंह : (खुषीत) ओम नमोः शिवाय . . ओम नमोः शिवाय . .

(शिपाई व पंडितबुवा निघून जातात. चक्रमसिंह महाराज पुन्हा देवाचे स्मरण करीत बसतात. तेवढ्यात दवंडी दिल्याचा आवाज ऐकू येतो.)

आवाज : ऐका हो ऐका....

डमडम नगराचे म्हाराजे चक्रमसिंह यांच्या हुकुमावरून सर्वांना कळविण्यात येते की, जो कोनी डमडम नगरातील जंगलात राहणाऱ्या डमरू राक्षसास ठार मारील त्यास दहा हजार मोहरा बक्षीस देण्यात येतील हो . . . !

(पुन्हा एकदा दवंडी दिल्याचा आवाज ऐकू येतो.)

आवाज : ऐका हो ऐका . . .

डमडम नगराचे म्हाराजे चक्रमसिंह यांच्या हुकुमावरून सर्वांना कळविण्यात येते की, जो कोनी डमडम नगरातील जंगलात राहणाऱ्या डमरू राक्षसास ठार मारील त्यास दहा हजार मोहरा बक्षीस देण्यात येतील हो . .

(दवंडी देऊन पुन्हा दोघे पहारेकरी ससाजी व मसाजी रंगमंचावर प्रवेश करतात.)

मसाजी : अरे गड्या ससाजीराव, आपण त्या राक्षसाच्या इरुद्ध दवंडी पिटिवली खरी, पण . . पण मला तर लय भीती वाटायला

लागली बवा ! (अधिक घाबरत) त्यो डमरू राक्षस येऊन धरायचा तर न्हाय ना आपल्याला ?

ससाजी : आरं, मी हाय ना भक्कम, तू कशाला घाबरतो ?
(तेवढ्यात मागे माळ जपीत बसलेले चक्रमसिंह महाराज मध्येच ओरडतात.)

चक्रमसिंह : ओम नमोः शिवाय . . . ओम नमोः शिवाय . . .
(महाराजांचा आवाज ऐकून घाबरून ससाजी पळत जाऊन मसाजीच्या अंगावर उडी मारून बसतो.)

ससाजी : (घाबरत) अगं आयो, डमरू राक्षस आला . . डमरू राक्षस आला . .

मसाजी : आरं, यवढं काय झालं तुला घाबराया ? आँ ? इकडं ये, इकडं ये. राक्षस न्हाय आला. तिकडं बघ. (महाराजांकडे बोट दाखवीत) म्हाराज द्येवाचं स्मरण करत्यात, समजलं ?

ससाजी : अगं आयो . . . (उसासा टाकत) मला वाटलं की त्यो जंगलातला डमरू राक्षसच आला धरायला !

मसाजी : मगाशी लय भाव मारत व्हता ना ? आता झाली का नाय फजिती ?

ससाजी : बेटचा, त्यो डमरू राक्षस लय खतरनाक हाय. आपण त्याच्या इरुद्ध दवंडी पिटवली, तवा त्यो आपल्याला काय सोडणार न्हाय. तू संभाळून रहा, तू पहिली दवंडी दिली, तवा त्यो पहिलं तुलाच धरनार. (मसाजी घाबरतो.)

चक्रमसिंह : (मध्येच ओरडतो) ओम नमोः शिवाय . . ओम नमोः शिवाय ... (आवाज ऐकून मसाजी घाबरतो आणि पळू लागतो तोच ससाजी त्याचा पाय धरतो, तसा मसाजी खाली आपटतो.)

ससाजी : (मसाजीला उठवत) आरे, राक्षस नाय आला. आपल्येच म्हाराज वराडले.

मसाजी : मला वाटलं का त्यो राक्षसच वराडला.

ससाजी : बेटच्या, त्यो बोलूनचालून राक्षस हाय राक्षस ! अन् त्यो कशाला द्येवाचं नाव घील ? द्येवाचं अन् राक्षसाचं न्हेमी वाकडं आसतं, ठाव हाय का तुला ? मग त्यो राक्षस कशाला बोंबलायला द्येवाचं नाव घील.

मसाजी : खरंच की ! तुझंपन म्हननं बराबर हाय. पण मी म्हनतो त्या राक्षसानं आपल्या म्हाराजांचं काय बिगडवलंय तवा त्याला ठार मारन्यासाठी म्हाराजांनी बक्षीस ठिवलंय ? . .

ससाजी : वा . . वा . . म्हंजी यवढे दिस तू दरबारात काम करतोस अन् तुला चक्रमसिंह म्हाराजाचं आन् डमरू राक्षसाचं काय वैर हाये हे ठावं नाय म्हंजी कमालच हाये.

मसाजी : अरं गड्या, त्याचं काय ठाव हाय का तुला ? आपलं म्हंजी कसं, आपलं काम भलं का आपुन भलं ! आपुन भलं की, आपलं काम भलं ! तवा आपुन दुसऱ्या कुनाच्या भानगडीत पडतच नाय बघ. पर ल्येका, तुला यवढं समदं कसं काय कळालं रं ?

ससाजी : आरं, आपल्या डमडम नगरातील गल्लीगल्लीतला बच्चा जाणतोय की चक्रमसिंह म्हाराज अंधश्रद्देने इक्ते भरकटत गेले हायेत की, त्यामुळे म्हाराज प्रजेच्या कल्याणासाठी बिल्कुल लक्ष द्येत न्हाईत. तर उलट आज कुठं महायज्ञ करा, तर उद्या कुठं सत्यनारायनाची पूजा घाला, तर कधी साधूसंतांना पैसं दान करा, यातच म्हाराज पैसं वायफट घालवू लागल्येत. इकडं बिचारी परजा मात्तुर कराच्या असह्य वझ्यानं पार तरासून गेलीया.

मसाजी : त्ये ठीक हाय रं, पर त्या डमरू राक्षसाचं अन् आपल्या म्हाराजांचं काय वैर हाय तुला ठाव हाय का ? मला त्या दिवशी परधानजीनी सांगितलं की, चक्रमसिंह म्हाराजांना पंडितांनी, म्हंजी ज्योतिषबुवांनी सांगितलं की, तुझ्या डमडम नगरातील जंगलात खूप मोठं देवस्थान आहे तवा तू ते मोठं जंगल तोडून तिथं मोट्टं देऊळ बांध म्हंजी तुला खूप मोठं पुण्य प्राप्त ईन्हल आन् तुझ्या नावाची कीर्ती सगळीकडं व्हईल.

मग नगरातील वैतागलेली परजा खूष व्हईल आन् तुझ्या नावाचा जयजयकार करतील. तवा म्हाराजांनी जंगल तोडायचं ठरवलंय.

ससाजी : आरं, पन त्या जंगलात डमरू राक्षस राहतोय त्याचं काय ?

मसाजी : म्हणून तर म्हाराज जंगल तोडायला घाबरत्यात.

ससाजी : हां, आता आलं ध्येनात. म्हणूनच म्हाराजांनी त्या जंगलातील डमरू राक्षसाला ठार मारण्यासाठी दवंडी पिटिवलीय.

मसाजी : सगळा घोळात घोळ करून ठिवलाय म्हाराजांनी आणि आत्ता बसल्येत ओम नमो शिवाय करीत.

ससाजी : ये, तुला ठावं हाय का गड्या, माझी म्हातारी आई म्हणत व्हती की ह्या जंगलात बऱ्याच वर्षापासून राक्षस राहतोय अन् म्हनं त्यो राक्षस लयी दयाळू हाय. त्यो चांगल्यासंगती चांगला अन् वाईटासंगती वाईट हाय. माझ्या म्हातारीनं माझ्या म्हाताऱ्याची अन् राक्षसाची खरी घडलेली गोष्ट पन सांगितली.

मसाजी : काय म्हणाला ? गोष्ट ? ये, मग सांग ना गोष्ट.

ससाजी : गोष्ट म्हटलं की लागला कान देऊन ऐकायला. ल्येका, ही अशी तशी गोष्ट नाय. ही खरी खरी घडल्याली गोष्ट हाय. समजलं का ?

मसाजी : बरं बाबा, मग ती तरी गोष्ट सांगशील का नाय ?

ससाजी : सांगतो की, नीट कान देऊन ऐक. माझी म्हातारी म्हनत व्हती की... माझी म्हातारी म्हनत व्हती की... माझी म्हातारी म्हनत व्हती की...

मसाजी : ये बेट्या, बिगडलेल्या रेकॉर्ड प्लेटसारखा काय त्येच त्येच म्हनत व्हती की, म्हनत व्हती की लावलंय, पुढं काय सांगनार हाईस का नाय ?

ससाजी : आरं, माझ्या जरा ध्यानात तर येऊ दे. हां आता आटवलं सगळं. माझी म्हातारी म्हनत व्हती की, येकदा माझा म्हातारा बाप लाकडं तोडायला जंगलात गेलता. लाकडं तोडता तोडता अचानक त्याची कुऱ्हाड तळ्यामधी पडली. आता आली का

पंचायत...त्या कुऱ्हाडीवर तर आमचं सगळ्याचं पोट चालायचं. तवा म्हाताऱ्याने त्या तळ्यात उतरून कुऱ्हाड लय शोधली पन कुऱ्हाडीचा काय पत्त्याच नाय. माझे म्हातारे आजोबा निराश चेहऱ्याने घरी निघाले. तवा अचानक त्यांना डमरू राक्षसाचा आवाज आला, त्या डमरू राक्षसानं माझा म्हातारा प्रामाणिक आहे की नाही हे जाणून घेण्याकरिता त्यानं माझ्या म्हाताऱ्याची परीक्षा घ्यायचं ठरवलं. डमरू राक्षसानं माझ्या म्हाताऱ्याला मदत केली. त्यानं पहिल्यांदा तळ्यातून हिऱ्यांनी मडवलेली कुऱ्हाड दाखवली, पर माझा म्हातारा लय शहाणा, त्यानं ती कुऱ्हाड घेतलीच नाय.

मसाजी : काय म्हनाला? हिऱ्यांनी मडवलेली कुऱ्हाड तुझ्या म्हाताऱ्यानं घेतली नाय.

ससाजी : नाय घेतली. कारन ती आमची नव्हतीच. मग डमरू राक्षसानं माझ्या म्हाताऱ्याला सोन्याची कुऱ्हाड दिली. पण माझा म्हातारा लय शहाणा. त्यानं ती पण कुऱ्हाड घेतली नाय.

मसाजी : काय म्हनतो? सोन्यानं मडवलेली सोन्याची कुऱ्हाड बी तुझ्या म्हाताऱ्यानं नाय घेतली?

ससाजी : नाय घेतली. माझा म्हातारा लय पारमाणिक मानूस! त्याला खोटेपणा बिलकूल आवडत म्हवता, मग त्यो कशाला घेईल सोन्याची कुऱ्हाड? कारण ती आमची नव्हतीच. मग त्या डमरू राक्षसानं माझ्या म्हाताऱ्याला चांदीची कुऱ्हाड काढून दावली. पण माझा म्हातारा लय...

मसाजी : दीडशहाणा! त्यानं ती पण कुऱ्हाड नाय घेतली असंच ना?

ससाजी : कसा घेईल माझा म्हातारा, लय पारमाणिक मानूस. या डम-डम नगरात आता असा मानूस शोधून पन सापडणार नाय; तर त्या डमरू राक्षसानं माझ्या म्हाताऱ्याचा प्रामाणिकपणा पाहून त्यानं चारीच्या चारी कुऱ्हाडी माझ्या म्हाताऱ्याला बक्षीस दिल्या.

मसाजी : अरे वा...वा, मग तर लय चंगळ झाली असंल तुमची, न्हाय का ?

ससाजी : अरे बाबा, कसली चंगळ ? माझा म्हातारा आडानी मानूस. त्यानं सरळ त्या कुऱ्हाडी घेतल्या अन् चक्रमसिंह म्हाराजांच्या ताब्यात दिल्या (रडतो) पर...पर...त्या चक्रमसिंह म्हाराजांनी माझ्या म्हाताऱ्यावर चोरीचा आळ घालून त्याला तुरुंगात डांबून ठिवलंय (पुन्हा रडतो) अं...अं...अं...

मसाजी : गप ! गप जाऊ दे, रडू नको, पर मग तू या दरबारात कसा काय कामाला लागला ?

ससाजी : काम नको करू तर मग काय उपाशी मरू का ? अरे बाबा, या पोटासाठी काही तरी केलंच पायजे ना ! पर येकदा संधी मिळाली की मी बरोबर या चक्रमसिंह राजाला धडा शिकवनार हाय !

मसाजी : पण काय रे सश्या ' (दाताखाली जीभ चावून) नाय आपलं ससाजीराव, ही गोष्ट तुझ्या म्हातारीनं सांगितली नाय का ? अन् त्या गोष्टीला तू चांगली फोडणी देऊन मला सांगतो नाय का ? बेट्या, थापा मारायचा धंदा आता बंद कर. अन् थापाच मारायच्या असतील तर खरं वाटतील अशा थापा माराव्यात. बेट्या, तुला धड थापा बी मारता येत नाय, काय म्हनं तर दुसरी शिकलाय !

ससाजी : बेट्या, तू किती शिकलास रे, दुसरीच ना ? फरक यवढाच हाय की तू दुसरी नापास अन् मी दुसरी पास !

मसाजी : पण तुला ठाव हाय का ? मी आता बाहेरून दुसरीच्या परीक्षेला बसनार हाय.

ससाजी : थापा नको मारू, थापा नको मारू, आत्तापर्यंत किती येळा बसला, पर येकदा तरी पास झाला का ?

मसाजी : बेट्या, तू कापी करून परीक्षेला पास झाला हे कधी सांगणार ? तू आता सांगितल्याली गोष्ट थाप व्हती की नाय ?

ससाजी : न्हाय रे, खरंच न्हाय, तुला खोटं वाटत आसल तर चल तुरुंगात माझ्या म्हाताऱ्याला विचारायला ?

मसाजी : कुठं, तुरुंगात ? नको रे बाबा, तू म्हनतो तेच खरं आसल, पन काय रे, तुझ्या म्हाताऱ्याला तुरुंगात या चक्रमसिंह राजानं डांबून ठिवलंय मग तू या दरबारात कशी चाकरी करतो ?

ससाजी : आरं मग दुसरं काय करणार ? एक तर बाहेर वशिल्याबाजी-मुळे नोकरी मिळत नाही, नाइलाजानं इथं नोकरी करतोय अन् पोट भरतोय बघ कसं तरी. आरं, आपलं तरी ठीक हाय, पन बिचाऱ्या गरीब परजेचं काय हाल ?

मसाजी : काय इचारू नको, सगळीकडं दुष्काळ ? आपल्या या चक्रमसिंह म्हाराजांच्या दुर्लक्षामुळं सगळीकडं अंदाधुंदी माजली बघ, अन् इकडं म्हाराज डोळे मिटून निसतं आपलं ओम नमो: शिवाय करत बसल्यात.

ससाजी : पन मी म्हनतो त्यांच्या त्या ओम नमो: शिवाला तरी डोळं हाईत का नाय, त्याला नाय का परजेचं दु:ख दिसत, का त्यो बी या चक्रमसिंह म्हाराजांसारखं डोळं झाकून बसलाय.

मसाजी : तू अगदी माझ्या मनातलं बोललास बघ, पण हे सर्व त्या चक्रमसिंह म्हाराजांना कोन सांगनार ? म्हाराजांनी त्या भविष्यवाल्याचं ऐकून राज्याच्या तिजोरीतल्या पैशाची वाट लावली. कधी महायज्ञ करा, कधी सत्यनारायनाची पूजा घाला, तर कधी दानधरम करा. पण म्हाराज परजेच्या गैरसोयी मातर दूर करत न्हाईत.

मसाजी : आता ह्ये सगळं म्हाराजांना सांगायचं म्हंजी उंदरानं मांजराच्या गळ्यात घंटा बांधावी यवढं अवघड काम हाय. पन तू घाबरू नको.

मसाजी : घाबरू नको तर काय करू ? जो या चक्रमसिंह म्हाराजांच्या इरुद्ध बोलल त्याची डायरेक कत्तल केली जाते.

ससाजी : नावापरमानंच आपलं चक्रमसिंह म्हाराज चक्रम दिसत्यात म्हाय का ?

(चक्रमसिंह महाराज मध्येच ओरडतात.)

चक्रमसिंह : ओम नमो: शिवाय . . ओम नमो: शिवाय

ससाजी–मसाजी (घाबरून) : अम आ . . .यो !

(दोघेजण घाबरून एकमेकांना मिठी मारतात, नंतर पुन्हा एकमेकांपासून बाजूला होतात. चक्रमसिंह महाराज जप करण्यात मग्न आहेत असे पाहून पुन्हा गप्पा मारण्यास सुरुवात करतात.)

ससाजी : मला वाटलं म्हाराजांनी आपलं बोलणं ऐकलं का काय ?

मसाजी : तिकडं बघ, म्हाराज एखाद्या गोसाव्यापरमानं स्वांग घेऊन कसं जप करीत बसत्यात.

ससाजी : राज्यकारबार सोडून, आसंच म्हनायचं ना तुला ?

मसाजी : आरं परधानजी हाईत की, राज्यकारबार सांबाळायला.

ससाजी : बेटया, म्हाराज शेर, तर परधानजी सव्वाशेर ! परधानजी म्हंजी मुंह मे राम अन् बगल में छुरी ! असा कारबार हाय परधानजीचा. सोताचीच भरती करून घ्येनारा. परधानजीचं पद मिळाल्यापासून त्यानं समद्या राज्यकारबाराचं वाटळं केलंय.

चक्रमसिंह (पुढे येत, रागात) : ओम नमो: शिवाय . . . ओम नमो: शिवाय . .

ससाजी–मसाजी : ओम नमो: शिवाय...ओम नमो: शिवाय . .

(अचानक बोलतात आणि चूक लक्षात येताच दचकून भानावर येतात. खाली वाकून महाराजांना मुजरा करतात.)

ससाजी–मसाजी : म्हाराजांचा जयजयकार असो !

चक्रमसिंह : काय रे, तुम्ही पहारा देता का गप्पा मारता ?

ससाजी–मसाजी (सहजपणे) : म्हाराज, आम्ही पाहरा नव्हतो देत, गप्पा मारत व्हतो.

महाराज (रागावत) : काय म्हणालात ?



ससाजी मसाजी

ससाजी–मसाजी : गप्पा न्हवतो भारत म्हाराज, पहाराच, देत व्हतो.

चक्रमसिंह (मसाजीकडे पाहात मसाजीला हाक मारतो.) : ससाजी !

मसाजी : म्हाराज मी ससाजी न्हाय, मसाजी हाय.

चक्रमसिंह : ओम नमो: शिवाय . . ओम नमो: शिवाय . .
तुम्हाला किती वेळा सांगितलं की, ससाजी तू माझ्या उजव्या हाताला उभं राहात जा आणि मसाजी तू डाव्या हाताला उभं राहात जा. म्हंजे माझा पुन्हा पुन्हा घोटाळा होणार नाही.
(दोघेजण सांगितल्याप्रमाणे उभे राहतात,) हं ठीक आहे. तर मसाजी कोण ?
(मसाजी हात वर करतो) आणि ससाजी कोण ?
(पुन्हा मसाजीच हात वर करतो, तेव्हा चक्रमसिंह महाराज मसाजीवर खवळतात.)
ओम नमो: शिवाय. . . ओम नमो शिवाय. . . अरे गाढवा मसाजी ! तूच मसाजी अन् तूच ससाजी काय ?

मसाजी : म्हाराज त्याने हात वर केला न्हाय म्हून त्याच्या वरचा हात वर मी क्येला ?

चक्रमसिंह : ओम नमो: शिवाय... ओम नमो: शिवाय...
(वैतागून) अरे गाढवांनो, हा असा रोज घोटाळा कुठपर्यंत चालणार ? ससाजी तू हात वर का केला नाहीस ?

ससाजी : म्हाराज, मसाजी त्यो असल्यावर मग ससाजी कोन असनार मीच ना ? मंग हात वर क्येलाच पायजे असं काय रिवाज हाये का ?

चक्रमसिंह : ठीक आहे. ठीक आहे. आम्हाला जास्त ज्ञान शिकवू नका, प्रधानजी कोठे गेलेत ?

ससाजी–मसाजी : परधानजी, म्हसनात !

चक्रमसिंह (दरडावून) : काय म्हणालात ?

ससाजी : न्हाय म्हंजी म्हाराज, त्याचं काय हाव, असं तुम्ही ओम नमो शिवाय करता तसं...

मसाजी : परधानजीबुवा हरी... हरी... करित फिरत्यात.

ससाजी : तुम्ही ओम नमो: शिवाय...

मसाजी : परधानजीबुवा हरी.. हरी...

चक्रमसिंह : अरे हे कसलं कीर्तन लावलंय तुम्ही ? मला पहिल्यांदा सांगा की दवंडी पिटवली की नाही ?

ससाजी : होय म्हाराज. परधानजींनी सांगितल्यापरमानं आमी दवंडी पिटवली.

चक्रमसिंह : प्रधानजींनी सांगितल्याप्रमाणे ? अरे पण नेमकी कशी ?

ससाजी–मसाजी : आता कशी म्हंजी ? मगाशी पिटिवली तशीच.

चक्रमसिंह (वैतागून) : ओम नमो: शिवाय... ओम नमो: शिवाय... ! अरे गाढवांनो, आता तुमच्यासमोर मी डोकं आपटून घेऊ का ?

ससाजी–मसाजी : हो... !

चमर्क्रसिंह (दरडावून) : काय म्हणालात ?

ससाजी–मसाजी (कान पकडून) : चुकलो म्हाराज !

चक्रमसिंह : ठीक आहे, ठीक आहे, जास्त शहाणपणा करू नका, आमच्यासमोर. दवंडी कशा प्रकारे नगरात पिटवली, त्याचे आमच्यासमोर प्रात्यक्षिक करून दाखवा.

मसाजी (डोके खाजवीत) : पारति...शक.. ?

ससाजी : ये येड्या, पारतक्षिक असं म्हणायचं ! पारतक्षिक म्हंजी म्हाराजांन् समोर करून दाखवायचं, समजलं का ?

मसाजी : न समजायला काय झालं ? लगीच लागला मला शिकवायला ! मला काय म्हाईत न्हाय का ?

ससाजी : तुला फक्त बोंबलायचं म्हाईत हाय, म्हंजी दवंडी पिटवायचं रे !

चक्रमसिंह (दोघांकडे रागात पहात) : ओम नमो: शिवाय... ओम नमो शिवाय...

ससाजी–मसाजी (लगेच दवंडीचे प्रात्यक्षिक सुरू करतात.) : ऐका... हो...ऐका ! ऐका...हो...ऐका .. !

चक्रमसिंह : अरे पण काय ऐका ?

ससाजी : पैशाला, दोन बायका !

मसाजी : बेटचा, हे काय आरवाचं राज्य हाय का, तवा पैशाला दोन बायका म्हनतोस ?

चक्रमसिंह : अरे गाढवांनो, व्यवस्थित करून दाखवता की नाही, प्रात्यक्षिक ? नाहीतर मला तुमचा बंदोवस्त करावा लागेल.

ससाजी }
मसाजी } (कान पकडून) : चुकलो म्हाराज !

(ससाजी व मसाजी एअ आवाजात चक्रमसिंह महाराजांसमोर दवंडीचे प्रात्यक्षिक करून दाखवतात.)

ससाजी }
मसाजी } : ऐका...हो...ऐका ! डमडमनगराचे म्हाराजे, चक्रमसिंह, यांच्या आज्ञेवरून कळविण्यात येते की, जो कोनी आपल्या डमडमनगरातील जंगलामधील राहणाऱ्या डमरू राक्षसास ठार मारील, त्यास दहा हजार सोन्याच्या म्होरा बक्षीस देण्यात येईल हो... !

चक्रमसिंह : शाब्बास ! चांगली दवंडी पिटवलीत. आता लागा तुम्ही तुमच्या कामाला, (दोघेजण निघून जातात.) हा:.. हा:...हा:... त्या दहा हजार मोहरांसाठी लाखो नागरिक त्या डमरू राक्षसाला मारायला जातील. (पुन्हा हासतो.) हा:...हा: हा:... ! लाखो नागरिक आणि एकटा डमरू राक्षस ! आता त्याला कोणीच वाचवू शकणार नाही. लोक त्याला ठार मारतील, मग मी ते घनदाट जंगल तोडणार. तिथे लाखो रुपये खर्चून भव्य असे मोठे देऊळ बांधणार. मग त्यामुळे सगळीकडे माझी कीर्ती पसरेल, मला खूप मोठे पुण्य प्राप्त होईल. (हासतो.) हा:...हा:... हा:.. ! आता पाहतोच तो डमरू राक्षस कसा जिवंत राहातो ते. मला पण या डमडम नगराचा राजा म्हणतात, राजा ! (पुन्हा हासतो.) हा: ..हा: हा:... ! ओम नमो: शिवाय... ओम नमो: शिवाय...



डमरू राक्षस

## प्रवेश दुसरा

(रंगमंचावर घनदाट जंगलाचे दृश्य, डमरू राक्षस आणि त्याचा आवाज. डमरू राक्षस स्लाइडने पडद्यावर दाखवणे. डमरू राक्षसाचा आवाज (टेप करून तो) ऐकवणे.

डमरू राक्षस : (मोठ्याने हासत) हाः... हाः... हाः... हाः... ! डम...डम...डमरू ! डम...डम...डमरू ! हा...हा... हा... हा... ! मी आहे राक्षस ! दैत्य, असुर ! माझं नाव डमरू...! डमरू राक्षस ! (पुन्हा हासतो.) हा...हा...हा...हा... !
मी आहे आदी आणि अंती डमरू राक्षस. माझं नाव मोठं, माझं मन मोठं, माझी शक्ती मोठी, माझं सामर्थ्य मोठं, मी शिव, आणि समाजसेवाधारी राक्षस डमरू, डमरू राक्षस ! (हासतो.) त्या कपटी स्वार्थी आणि देवभोळ्या अंधश्रद्धाळू चक्रमसिंहराजानं मला ठार करण्यासाठी दहा हजार मोहरांचं बक्षीस ठेवलंय्, ठेवू दे. ठेवू देत. पण मी त्याला माझा इंगा दाखविणार. त्याला माझ्या सामर्थ्याची कल्पना नाही. तो समजत असेल की, मी राक्षस आहे, निर्बुद्ध आहे. पण चक्रमसिंह राजा मी फार सावधान आहे.

अरे चक्रमसिंहा, तुला मी वठणीवर आणणार. तुला माझी शरणागती पत्करावी लागणार. मी निरनिराळ्या देशांतील विद्वान्, शास्त्रज्ञ इथं बोलावणार आणि त्यांच्या मदतीनं तुझं भोळेपण, तुझं ढोंग मी जगाच्या वेशीवर टांगणार. (हासतो.) माझा माणसाच्या शक्तीवर आणि कर्तृत्वावर विश्वास आहे. तुझ्यासारखा मी देवभोळा नाही. मी तुला आता जिंकणार आणि तुला शरणागती पत्करावी लागणार. तुला मी वठणीवर आणणार. (हासतो.) हाः...हाः...हाः...हाः... ! मला पण डमरू राक्षस म्हणतात.

अरे समाजद्रोही मानव प्राण्या, माझ्यात एवढी शक्ती आहे की, मी तुझे सर्व राज्य एका क्षणात नष्ट करू शकेन. पण मी तुझ्या-सारखा एवढा क्रूर नाही. पण मला प्रजेच्या कल्याणासाठी आणि तुला अद्दल घडविण्यासाठी काही तरी हालचाल केलीच पाहिजे. (पुन्हा हासतो.) हाः…हाः…हा हाः… !

(राक्षसाच्या हसण्याच्या आवाजाबरोबरच हळू हळू अंधार होतो. लयबद्ध संगीत सुरू होते, रंगमंचावर अंधुक प्रकाशामध्ये संगिताच्या तालावर चार दिशेने चार शास्त्रज्ञ वेगवेगळ्या वेशभूषा धारण केलेल्या अवस्थेत येतात. आणि प्रत्येकजण संगिताच्या लयबद्ध चालीवर गाणी म्हणत नाचतात.)

जपानी : मी जपानी चूहा, मी बलवान चूहा !
नाही भीती कसली आम्हा, मी चतुर चूहा !!
अंधश्रद्धा माहीत नाही, आळस आम्हा.
ज्ञान कण कण मोत्यापरी करितो जमा,
मी जपानी चूहा, मी बलवान चूहा !
नाही भीती कसली आम्हा, मी चतूर चूहा !!
नाही ठाऊक भांडण तंटा आम्हा.
नम्रता अंगी आमच्या दयाळूपणा.
मी जपानी चूहा, मी बलवान चूहा !
नाही भीती कसली आम्हा, मी चतूर चूहा !!
(चौघे मिळून नाचतात, नंतर फ्रेंच मानव गीत गात नाचतो.)

फ्रेंच : हासा आणि लठ्ठ व्हा, करू नका ऑ–ऊँ–ऑ !
मी आहे हो जांजुआँ !!
आम्ही फ्रेंच सारे बांधव, आम्हीच आमचे त्राता !
दुःख असो वा सुख असो, पचवू आम्ही जाता जाता !
हासा आणि लठ्ठ व्हा, करू नका हो ऑ–ऊँ–ऑ !
मी आहे हो जांजुआँ !!
कौतुकाने पाही आम्हा जग सारे हाः…हाः…हाः

कार्य कठीण असो वा सोपे, हाती घेऊ ते तडीस नेऊ हा...हा,
हासा आणि लठ्ठ व्हा, करू नका हो ऑ–ऊ–ऑ !
मी आहे जाजुऑ ! !
(चौघेजण मिळूत नाचतात, नंतर जर्मन मानव गीत गात नाचतो.)

जर्मन : सत्ता सांगा कुणाची, सत्ता माझ्या देशाची,
माझा देश सांगा कुणाचा, माझा देश समाजवाद्यांचा.
माझ्या जर्मनी देशात, सर्व आनंदात राहतात.
भेदभाव, जातीभेद विसरूनी, सर्व आनंदात नांदतात.
सत्ता सांगा कुणाची, सत्ता माझ्या देशाची.
(चौघे मिळून गीत गात नाचतात, नंतर रशियन मानब गीत गात नाचतो.)

रशियन : माझा देश रशिया, मी रशियाचा !
कधी कामगारांसाठी लढा, कधी अन्यायासाठी लढा !
माझा देश रशिया, मी रशियाचा !
रशिया माझा देश असा हा राग आम्हा शोषणाचा,
...... ... राग आम्हा शोषणाचा.
माझा देश रशिया, मी रशियाचा !
देव ना लागे, धर्म ना लागे.
वेड आम्हा देशप्रेमाचे ! वेड आम्हा देशप्रेमाचे.
माझा देश रशिया, मी रशियाचा.
(रशियन मानवावरोबर सर्वजण नाचू लागतात, त्याचवरोबर डमरू राक्षसाचा आवाज ऐकू येतो.)

डमरूराक्षस : हा हा...हा...हा... । डम...डम . डमरू ! डम...डम डमरू ! घाबरू नका मित्रांनो, घाबरू नका. तुम्ही सर्वजण माणसाच्या कल्याणासाठी झटणारे आहात आणि शिवाय मोठे शास्त्रज्ञ आहात. तुमच्या विज्ञानाच्या शक्तीपुढे जगातील शक्ती क्षुद्र ठरते, म्हणूनच तुम्हांला जनकल्याणासाठी मी इकडे आणले



जपानी फ्रेंच जर्मन रशियन

आहे. मित्र हो, मी देखील सामान्य माणसाच्या दु:खासाठी झटणारा आहे. सामान्य माणसाचे दु:ख पाहुन मला फार वाईट वाटते, आणि माझे मन कष्टी होते. म्हणूनच तुमच्या मदतीची मला अत्यंत गरज आहे.

जपानी : सरकार, तुम्ही फक्त हुकूम सोडा, आम्हाला कोणती कामगिरी करायची ती समजावून सांगा, आम्ही ती यशस्वीरीत्या पार पाडू असा आम्हाला विश्वास वाटतो.

राक्षस : शाब्बास ! माझ्या मित्रांनो, शाब्बास ! तर ऐका. मी तुम्हाला कामगिरी समजावून सांगतो, या डमडमनगराचा राजा चक्रमसिंह फार देवभोळा आहे. प्रजेकडून कराच्या रूपाने पैसे वसूल करून त्याने अंधश्रद्धेपोटी मोठे मोठे महायज्ञ करून राज्याच्या तिजोरीतील पैशाची त्याने वाट लावली. या नगरात मोठा दुष्काळ पडला आहे. तरी तो प्रजेच्या दु:खाकडे दुर्लक्ष करून मनमानेल तसा देवाधर्माच्या नावाखाली पैसा उधळतो आहे. त्याला या देवधर्माच्या वेडातून मुक्त करून जनतेच्या कल्याणासाठी त्याचे लक्ष केंद्रित करायचे आहे. त्यासाठी मी सांगेन तसे तुम्हाला करायला हवे.

सर्वजण : होय सरकार, त्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

डमरूराक्षस : ठीक आहे, मित्रांनो ! जनसामान्यांच्या कल्याणासाठी तुम्ही झटता म्हणूनच मी तुम्हाला पाचारण केले आहे. तेव्हा आता तुम्ही सर्वप्रथम त्या चक्रमसिंहाच्या राजवाड्यात जा. चक्रमसिंह आपल्या मुलांवर जिवापाड प्रेम करतो, तेव्हा जमल्यास तुम्ही त्याच्या मुलाला पळवून आणा, म्हणजे त्या चक्रमसिंहाला मी बरोबर सरळ मार्गावर आणतो. आपण सांगू तसेच तो वागेल. जा तुम्हाला यश प्राप्त होवो. तुमच्या सामर्थ्यापुढे तो देवभोळा चक्रमसिंह हार मानेल आणि शेवटी सत्याचाच विजय होईल. (हासतो.) हा:...हा: · हा: ··हा: ..

डम डम डमरू ! डम डम डमरू ! (पुन्हा हासतो.)

(राक्षस अदृश्य होताच सर्वजण वाट चुकल्याप्रमाणे इकडे तिकडे पाहतात.)

फ्रेंच : अरे थांबा ! मित्रांनो थांबा ! हे तर सर्व घनदाट जंगल दिसतंय. मग आपण कुठे निघालो ?

रशियन : येथे तर मनुष्यवस्ती अजिबात दिसत नाही.

जपानी : अरे बाबा ! ह्या घनदाट जंगलात मोठ्या मोठ्या वृक्षांशिवाय आणि हिंस्र पशुपक्षांशिवाय काहीच दिसणार नाही.

जर्मन : वा: ! वा: ! किती सुंदर, खरंच कमाल आहे येथील निसर्गसौंदर्याची ! मन किती प्रसन्न वाटतं नाही का ? सुंदर फुले, पक्षांचा किलबिलाट खूपच छान !

फ्रेंच : अरे ते सर्व गेलं खड्डयात. मला भूक लागली आहे, भूक ! पहिल्यांदा त्याची व्यवस्था करा !

रशियन : अरे मग कधी सांगणार ? चला बरे. आपल्याला येथे कोठे भोजन मिळते का ते पाहू.

सर्वजण : हो, हो, चला !

(चार दिशेला चार जण काहीतरी शोधण्याचा बहाणा करीत फिरतात, सर्वजण पुन्हा थकलेल्या अवस्थेत एकत्रित जमतात.)

जपानी : हे पहा मित्रांनो, आपल्याला येथे कोठेच जेवण मिळणार नाही. तेव्हा मला वाटते आपण सर्वजण नगरामध्येच गेले पाहिजे.

जर्मन : हो बरोबर आहे. आपल्याला नगरात गेल्याशिवाय जेवण मिळणार नाही. आपण नगरात जाऊ या.

सर्वजण : हो, हो. चला.

(सर्वजण उजव्या विंगेतून जातात आणि पुन्हा डाव्या विंगेतून प्रवेश करतात. सर्वजण खूप थकलेल्या अवस्थेत दिसतात.)

रशियन : सर्व नगर हिंडून आलो, पण कोणी सुद्धा जेवण दिलं नाही.

फ्रेंच : मला वाटलं होतं, आपण बाहेरच्या देशातून इथं आलो, तेव्हा येथील राजा अतिथी म्हणून आपलं स्वागत करील. जेवणाला पंचपक्वान्नं मिळतील. पण सगळी निराशा झाली.

जपानी : अरे कोठून आणतील ही माणसं आपल्याला जेवण ? आत्ता तुम्हीच पाहिलेतना येथील लोकांचे हाल. त्यांनाच दोन वेळचं जेवण मुष्कीलीनं मिळतं.

जर्मन : येथील राज्यकारभार व्यवस्थित चालवला जात नाही. येथील राजाच्या दुर्लक्षामुळे लोकांचे हाल चालले आहेत.

रशियन : नाहीतर काय ? मी जेव्हा या नगरात हिंडून आलो, तेव्हा पाहिलं तर, काही मोठे श्रीमंत लोक राजवाड्यात कॉटवर चेंडू-सारखे लोळतात. तर दुसरीकडे काही गरीब बिचारे लोक रस्त्यावर दगडासारखे फूटपाथवर पडलेले दिसतात.

फ्रेंच : अरे बाबा, म्हणून तर आपल्या सरकारने आपल्याला चक्रमसिंह राजाला वठणीवर आणण्यासाठी आणि येथील लोकांच्या गैर-सोयी दूर करण्यासाठी इकडं आणलं आहे.

जपानी : बरोबर आहे. आपण त्या चक्रमसिंह राजाला वठणीवर आणायलाच पाहिजे. तो प्रजेकडे दुर्लक्ष करतो. म्हणूनच नगरात अंधाधुंदी माजली आहे.

जर्मन : अरे मग, उशीर कशाला लावता ? चला ! आपल्या सरकारनं आपल्याला सांगितल्याप्रमाणे आपण चक्रमसिंह राजाच्या मुलाला उचलून आणू या.

सवजण : हो, चला चला !

(सर्वजण विंगेतून निघून जातात.)

## प्रवेश तिसरा

(दृश्य : रंगमंचावर सुंदर बागेचा पडदा. बागेमध्ये चक्रमसिंह राजाचा मुलगा राजपुत्र आणि मुलगी राजकन्या, दोघे बहीण–भावंडे शिवा–शिवीचा खेळ खेळत आहेत. राजपुत्राच्या डोळयांवर पट्टी बांधली आहे. तो राजकन्येला चाचपडत शिवण्याचा प्रयत्न

करतो आहे. तेवढ्यात रशियन, फ्रेंच, जपानी, जर्मन मानव तेथे येतात आणि त्यांचा खेळ पाहातात. राजपुत्र व राजकन्या खेळत गाणं म्हणतात.)

राजपुत्र : अहा, लाडके, लाडके, तायडे जरा हाती ये ना !
त्रास किती देणार तू लाडक्या दादाला ?
अहा लाडके, लाडके, तायडे ये ये ना,
पटकन ये ना, का तंगवते छोट्या दादाला ?
अहा लाडके, लाडके तायडे जरा हाती ये ना:
त्रास किती तू देणार लाडक्या दादाला ?
(राजकन्या त्याला लवकर सापडत नाही म्हणून तो चिडून खाली बसतो.)
जा गं तायडे, किती सतावतेस मला तू, मी नाही शिवणार तुला.

राजकन्या : (गाणे गात त्याच्या भोवती नाचू लागते.)
अहा लाडक्या, लाडक्या दादा आळस झटकुनी दे ना.
आळस शोभत नाही राजपुत्राला,
अहा, लाडक्या, लाडक्या, दादा धाव ..धाव ना.
पळ...पळ शिव लवकर तुझ्या ताईला !
अहा, लाडक्या, लाडक्या, दादा आळस झटकूनी दे ना.
आळस शोभत नाही, राजकुमाराला.
(गीत संपताच राजपुत्र राजकन्येला शिवतो.)

राजपुत्र (आनंदाने) हा:...हा: तायडीला शिवलो, तायडीला शिवलो. (डोळ्यांवर बांधलेली पट्टी काढत) हे बघ तायडे, आता तू मला शिवायचं. थांब मी तुझ्या डोळ्यांवर पट्टी बांधतो.
(राजपुत्र राजकन्येच्या डोळ्यांवर पट्टी बांधतो.)

राजकन्या : हे बघ, दादा जास्त लांब लांब पळायचं नाही हं, येऊ का शिवायला ?

राजपुत्र : हो, ये पाहू शिवायला !

(काही वेळ राजकन्या राजपुत्राला शिवण्याचा प्रयत्न करते. पण राजपुत्र राजकन्येच्या हाती लागत नाही.)

राजकन्या : कारे असा लांब लांब पळतोस दादचा, किती सतावतोस बरं ? मी कशी बरं तुला लगेच पटकन सापडते ?

(दोघांचा शिवा–शिवीचा खेळ चालू असताना. चौघेजण गप्पा मारू लागतात.)

जपानी : (हासत) हाः...हाः... आपण कसं रे त्या पहारेकऱ्याला उचलून हौदात टाकले. मजा आली ना त्याची ?

रशियन : ए, शू...! तिकडे पहा, आत्ताच उत्तम संधी आहे, त्या राजपुत्राला पळवून नेण्यासाठी. चला !

राजकन्या : (राजपुत्राला शोधत) कुठे गेला बरं हा दादचा ?

फ्रेंच : अरे, असे पाहता काय, चला आपण ठरवल्याप्रमाणे त्या चक्रमसिंह राजाच्या मुलाला पळवून नेऊ.

जर्मन : हो, हो ! चला उचला त्याला.

(सर्वजण हळू हळू पुढे येतात आणि त्या राजपुत्राचे तोंड दावतात आणि त्याला उचलून पळवून नेतात. राजकन्या मात्र राजपुत्राला शोधण्यासाठी इकडे तिकडे चाचपडते.)

राजकन्या : विक्रमभाऊ...विक्रमभाऊ...दादा.. दादा .. अरे, कुठं बरं लपून बसला हा ?

(राजकन्या डोळयांवर बांधलेली पट्टी काढते. इकडे तिकडे पाहते.)

अय्या ! कुठं गायब झाला हा ? मला फसवून राजवाड्यात गेला काय ? पहातेच आता त्याच्याकडे.

(असे म्हणत राजकन्या विंगेत निघून जाते.)



राजकन्या

## प्रवेश चवथा

(राजमहालाचे दृश्य. राजमहालात पहारेकरी ससाजी हा इकडून तिकडे येरझाऱ्या घालत पहारा देत आहे. तोच डाव्या दिशेतून घाबरलेल्या अवस्थेत दुसरा पहारेकरी मसाजी लंगडत लंगडत धावत पळत येतो आणि ससाजीला धडकतो. दोघेजण खाली पडतात.)

मसाजी : अगऽगऽगऽ! मेलो रे मेलो. मी कामातून गेलो. अगं आई गं ! (कण्हत) अरे बापरे ! मेलो रे मेलो.

ससाजी : आरं पन तुला ड्यूटी सोडून असं घोड्यापरमानं धावत पळत यायला काय झालं ?

मसाजी : (घाबरून मागे पुढे पाहात.) ड्यूटी ! ड्यूटी गेली खड्ड्यात.

ससाजी : अरे बाबा, पण तुला झालं तरी काय असं लट लट कापायला ?

मसाजी : (घाबरत) भ ..भ...भूत !

ससाजी : भूत ? कसलं ? अन् कुठाय ? क ..क ककाय म्हणालास ? भ...भ. भूत ? अरे बापरे ! (पळून जायचा प्रयत्न करतो पण मसाजी त्याला पकडून ठेवतो.)

मसाजी : आरं भुतं नाहीत, चार तऱ्हंची चार नमुनेदार मानसं हाईत. मी...मी बागेत पहारा देत व्हतो. राजकन्या अन् राजपुत्र दोघंबी बागेत शिवा-शिवीचा खेळ खेळत व्हते, अन् काय झालं ? कुठून तरी अचानक ती नमुनेदार मानसं आली अन् मागचा पुढचा इचार न करता मला त्यांनी पाण्याच्या हौदात फेकून दिलं. बघ बघ ! समदी कापडं भिजल्यात.

ससाजी : काय म्हणतोस ? त्या मानसांनी तुला बागंतल्या पाण्याच्या हौदात फेकून दिलं ?

मसाजी : आरं, खरंच गड्या मला हौदात फेकून दिलं तर दिलं. पण त्या गाढवांनी आपल्या छोटया राजकुमारालाबी पळवून नेलं. (रडतो.)अं...अं...अं...आता मी काय करू ?अं...अं...अं...!

ससाजी : हे बघ गड्या, आता रडत बसू नको, मी सांगतो तसं कर, म्हंजी या संकटातून तुझी सुटका व्हईल. आता जे काही घडलं त्ये म्हाराजांना जावून खरं खरं पटवून सांग. म्हंजी म्हाराज तुला काय बी करणार नाहीत. कळालं का ?

(तेवढ्यात ललकारी ऐकू येते.)

ललकारी : होशियार...! सावधान...! होशियार...! आपल्या डमडमनगरचे महाराजे चक्रमसिंह महाराज, राजमहालात प्रवेश करीत आहेत हो...!

ससाजी : हे बघ म्हाराज आले, मी निघतो माझ्या ड्यूटीवर, मी सांगितल्यापरमानं म्हाराजांना नीट पटवून सांग. मी निघालो.

(ससाजी निघून जातो, तोच पुन्हा ललकारीच्या आवाजाबरोबर चक्रमसिंह महाराजांचा प्रवेश.)

ललकारी : होशियार...! सावधान,..! होशियार ..! आपल्या डमडम नगरचे महाराजे चक्रमसिंह महाराज राजमहालात प्रवेश करीत आहेत हो...!

चक्रमसिंह : ओम नमो: शिवाय... ओम नमो: शिवाय...!

मसाजी : म्हाराजांचा जयजयकार असो.

चक्रमसिंह : (सिंहासनावर बसत) मसाजी !

मसाजी : आज्ञा असावी म्हाराज.

चक्रमसिंह : आम्ही एवढ्या दिवस तीर्थयात्रा करण्यात गुंतलो होतो, त्यामुळे आम्हाला अजून आमच्या नगरामध्ये काय घडामोडी चालल्यात याची यत्किंचितही कल्पना नाही. आम्हाला वाटतं आमच्या राज्यात सगळीकडं सर्व काही ठीक चाललेलं असेल, नाही का ? कारण परमेश्वर आमच्यावर सदैव खूष आहे. आम्ही आतापर्यंत कित्येक तीर्थक्षेत्रं केलीत, कित्येक मोठमोठ्या महापूजा घातल्या, कित्येक साधूसंतांना दानधर्म करीत आलो. तेव्हा अशा स्थितीत आमच्यावर संकटे येतीलच कशी ? नाही का मसाजी ? तुझं काय मत आहे ?

मसाजी : म्हाराज, खरं सांगायचं म्हंजी, मी पडलो गरीव. तुम्ही आहात म्हणून तर आमाला कसं तरी दोन घास पोटापुरतं मिळत्यात. तवा तुमच्या इरुद्ध बोलून आमी काय उपाशी मरणार ?

चक्रमसिंह . म्हणजे ? आम्ही तुझ्या बोलण्याचा अर्थ समजू शकलो नाही.

मसाजी : म्हाराज, मी जर का तुम्हाला माझं मत सांगितलं तर ते तुम्हाला पटणार न्हाई. उलट तुम्ही मला काही तरी शिक्षा कराल.

चक्रमसिंह : नाही मसाजी, आम्ही वचन देतो की, तुला कोणतीच शिक्षा करणार नाही. तेव्हा तुझं काय मत आहे ते आम्हास व्यवस्थित समजावून सांग.

मसाजी : म्हाराज, तुमी आज्ञा केली म्हून सांगतो. तुमी तीर्थयात्रंला गेल्यापासून आणि ह्ये गोसाव्याचं स्वांग धारण केल्यापासून आपल्या डमडम नगरात नको त्या घडामोडी चालू हायेत. परधानजी बुवा सुद्धा हरी हरी करीत, कीर्तन ऐकत, रोज देवळात जाऊन बसत्यात. त्यामुळे राज्यकारभाराकडं दुर्लक्ष झालंय, सगळं दरबारामधील मंत्री-संत्री मनमानेल तसा कारबार करत्यात. त्यामुळे नगरातील परजेच्या गैरसोयीकडे कोणीच लक्ष देत नाही. उलट काळाबाजार जास्त वाढलाय आणि समदीकडं दुष्काळाचं सावट पडलं हाये. तवा तुमी हे गोसाव्याचं स्वांग सोडून जरा राज्यकारभाराकडंही ध्यान द्यावं असं माझं ठाम मत हाय.

(तेवढ्यात चक्रमसिंह राजाची मुलगी राजकन्या प्रवेशते.)

राजकन्या (रडत) : बाबा . . . बाबा . . . विक्रमभाऊ की नाही, आज सकाळपासून दिसला नाही. तो कुठं गेला सांगा ना बाबा, तो कुठं गेला ?

चक्रमसिंह : अग वेडे ! तो इथंच कुठंतरी आसपास खेळत असेल, तुला एवढं घाबरायला काय झालं ?

राजकन्या : नाही बाबा, आम्ही दोघं आपल्या बागत शिवाशिवीचा खेळ खेळत होतो, तेव्हापासून तो दिसला नाही. (रडते.)

चक्रमसिंह : अगं, मग एवढं रडायला काय झालं ? त्यानं तुला फसवलं असेल. तो बागेतच लपून बसला असेल, बघ, शोधून काढ पाहू त्याला. (राजकन्या निघून जाते.)

मसाजी : म्हाराज, मी तुम्हाला काही सांगू का ?

चक्रमसिंह : हो बोल, मसाजी, अजून काय आम्हाला शहाणपणा शिकवायचं बाकी राहिलंय ?

मसाजी : म्हाराज, मी बागेत पहारा देत असताना आपली राजकन्या व राजपुत्र दोघं शिवाशिवीचा खेळ खेळत व्हते. तव्हा अचानक बाहेरून चार बिलंदर मानसं येऊन त्यानी मला उचलून हौदात फेकून दिलं. आणि-आणि त्यांनी आपल्या राजपुत्राला डमरू राक्षस राहतो, त्या जंगलाच्या दिशेनं पळवून न्येलं. मी त्यांना खूप शोधण्याचा परयत्न क्येला, पन काही उपेग झाला नाही.

चक्रमसिंह (रागात) : मसाजी ! तू शुद्धीवर आहेस काय ? तुझ्या हातून फार मोठी चूक झाली आहे. याबद्दल तुला शिक्षा भोगावीच लागेल. शिपाई . . . शिपाई. (दोन्ही विंगेतून दोन शिपाई प्रवेशतात.)

मसाजी : म्हाराज, यात माझा काय बी गुन्हा न्हाई. मी माझी ड्यूटी व्यवस्थित केली. त्या चार मानसान् समोर मी येकटा मानूस काय करनार ?

चक्रमसिंह (शिपायांना रागवत) : ओम नमो: शिवाय . . . ओम नमो: शिवाय. अरे गाढवांनो, असे माझ्या तोंडाकडे काय पाहाता? धरा या हरामखोराला, पहिल्यांदा माझ्या डोळ्यासमोरून दूर करा. आम्हाला शहाणपण शिकवतोय. आमच्या राज्यकारभारात ढवळाढवळ करून आम्हाला सूचना करतोय. म्हणे गोसाव्याचं सोंग सोडून राज्यकारभाराकडे लक्ष द्या. अरे, आम्ही एवढे तीर्थयात्रा करतो, महापूजा घालतो. अशा स्थितीत आमच्या नगरात संकटे येतीलच कशी ? परमेश्वर आमच्या पाठीशी उभा असताना

नगरात दुष्काळ पडेलच कसा ? आणि आमच्या राज्यात बाहेरील लोक येऊन थैमान घालतीलच कसे ?

शिपाई नं. १ : महाराजांनी आम्हास बोलण्याची आज्ञा द्यावी.

चक्रमसिंह : हं बोला, आता तुमचे काय म्हणणे आहे ?

शिपाई नं. १ : महाराज खरोखरच त्या बाहेरून आलेल्या माणसांनी आपल्या राज्यात थैमान घातले आहे. त्यांनीच आपल्या राजपुत्राला पळवून नेऊन त्या डमरू राक्षसाच्या हवाली केलं आहे.

चक्रमसिंह : काय म्हणालात ? आमच्या राजपुत्राला–विक्रमाला डमरू राक्षसाच्या हवाली केलंय. ओम नमो: शिवाय . . . ओम नमो: शिवाय . . . (स्वगत) त्या डमरू राक्षसाने आमचा अशा तऱ्हेने काटा काढला काय ? पण त्याने ती चार माणसे आणली कोठून ? आता शांत बसून चालणार नाही, प्रथम राजपुत्राची सुटका करून घेतली पाहिजे. शिपाई, जा. सर्व नगरात दवंडी पिटवा. जो कोणी आमच्या राजपुत्रास राक्षसाच्या तावडीतून सोडवील आणि त्या चार परदेशी मानवांना पळवून लावील त्यास आमची कन्या आणि अर्धे राज्य बक्षीस देण्यात येईल. (मसाजीकडे पाहात) आणि या बदमाशाला माझ्या समोरून घेऊन जा. जिवंत सोडू नका त्याला. कडक शिक्षा करा. उंच कड्यावरून फेकून द्या. जा !

मसाजी : नाही म्हाराज, नाही. तुम्ही हे काय करता ? तुम्ही शिक्षा करनार नाही असं मला वचन दिलतं. माझी काही चूक नसताना तुम्ही मला कशी काय शिक्षा करता ? बोला, म्हाराज बोला.

चक्रमसिंह (रागवत) : तुही ही हिम्मत ? मला पुन्हा जाब विचारतोस ? अरे गाढवांनो, काय याचे कीर्तन ऐकत थांबलात, घेऊन जा त्याला आणि द्या कड्यावरून फेकून.

(दोघे शिपाई मसाजीच्या दंडाला धरून ओढत नेण्याचा प्रयत्न करतात.)

मसाजी : नाही म्हाराज, मला योग्य न्याय मिळाल्याशिवाय मी इथून हलणार न्हाई. तुम्ही द्येवाचं मोठं भक्त आहात ना ? मग त्या द्येवानं तुम्हाला असंच लोकांवर अन्याय करायला सांगितलं का ? कुठं गेला तुमचा द्येव ? म्हाराज, तुमचा तो द्येवही खोटा आणि तुम्हीपण खोटे आहात. माझी काही चूक नसताना तुम्ही मला कडेलोटाची शिक्षा करताय, पण लक्षात ठेवा म्हाराज, तुम्हाला एक दिवस याचा जाव द्यावा लागंल. तुम्हाला या कर्माचा जाव द्यावा लागंल. म्हाराज तुम्हाला याचा जाब द्यावा लागंल. (असे म्हणत असतानाच शिपाई मसाजीला ओढत घेऊन जातात.)

चक्रमसिंह : (हासतो) हाः . . . हाः . . . हाः . . . !

ओम नमोः शिवाय . . . ओम नमोः शिवाय . . .

आम्हाला शहाणपणा शिकवतोय काय ? आम्हाला सूचना कर-तोय.

(हासतो.) हाः . . . हाः . . . हाः . . . ! आता त्याला चांगली कायमचीच अद्दल घडेल. जो आमच्या विरुद्ध बोलेल त्याची हीच दशा होणार.

(हासतो) हाः . . . हाः . . . हाः . . . !
ओम नमोः शिवाय . . . ओम नमोः शिवाय . . .
ओम नमोः शिवाय . . . ओम नमोः शिवाय . . .
ओम नमोः शिवाय . . . ओम नमोः शिवाय . . .
(रंगमंचावरील पडदा हळूहळ पडतो. मध्यंतर.)

❋ ❋

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

(रंगमंचावरील पडदा हळू हळू उघडत असतानाच दवंडी पिटवल्याचा आवाज ऐकू येतो.)

आवाज : ऐका...हो...ऐका... ! डमडम नगराचे महाराजे चक्रमसिंह यांच्या आज्ञेवरून कळविण्यात येते की, आपल्या डमडम नगरातील जंगलात स्थानिक झालेल्या मानवांना जो कोणी पळवून लावील त्यास महाराजांची कन्या व अर्धे राज्य बक्षीस देण्यात येईल होऽऽ. . .

(पुन्हा एकदा दवंडी पिटवल्याचा आवाज ऐक येतो.)

आवाज : ऐका हो...ऐका... डमडम नगराचे महाराज चक्रमसिंह यांच्या आज्ञेवरून कळविण्यात येते की, आपल्या डमडम नगरातील जंगलात स्थानिक झालेल्या मानवांना जो कोणी पळवून लावील त्यास महाराजांची कन्या व अर्धे राज्य बक्षिस देण्यात येईल हो...

(दवंडीचा आवाज संपल्यानंतर दोन शिपायांचा प्रवेश.)

पहिला शिपाई : ये गड्या... ! इकडे ये, इकडे ये. आलास का दवंडी देऊन ? दवंडी देऊन, ओरडून, ओरडून माझा तर पार घसा बसलाय बघ.

दुसरा शिपाई : माझी पण तीच तऱ्हा झाली, म्हणे जो कोणी त्या परदेशी मानवांना पळवून लावील त्यास राजाची कन्या अन् अर्धे राज्य पण बक्षीस. आता कोणता हिरा त्या परदेशी मानवांना पळवून लावील कोणाला माहीत ?

पहिला शिपाई : आरे तो डमरू राक्षस आहे, डमरू राक्षस ! त्याच्या केसाला पण कोणी धक्का लावू शकणार नाही. आपल्या महाराजांना अद्दल घडविण्यासाठी त्यानं चार निरनिराळ्या परदेशी माणसांना बोलावलंय. ती माणसं डमरू राक्षसाच्या आज्ञेपरमाणे काम करतात. त्यांनी आपल्या महाराजांची खोड मोडावी म्हणून आपल्या छोट्या राजपुत्राला पळवून नेलं आहे.

दुसरा शिपाई : मी तर म्हणतो, चांगलं झालं, आता तरी महाराजांचे डोळे उघडतील. त्या महाराजांनी अन् प्रधानजीबुवांनी लोकांचा नुसता छळ चालवलाय. परवाचीच गोष्ट. त्या मसाजीनं आपल्या महाराजांना चागला सल्ला दिला तर त्याचं न ऐकता उलट त्या मसाजीला महाराजांनी शिक्षा फर्मावली म्हणे, त्याला कड्यावरून ढकलून द्या.

पहिला शिपाई : अरे पण त्या मसाजीला अजून शिक्षा झालीच नाही. आपले प्रधानजीबुवा म्हणाले, आपल्या दरबाराच्या रीतीरिवाजानुसार गुन्हेगारांना दर शनिवारी शिक्षा अंमलात आणायची. तेव्हा त्या मसाजीला अजून तुरुंगातच डांबून ठेवलंय, अन् प्रधानजीबुवा गेले हरि.. हरि करीत तीर्थयात्रा करायला.

दुसरा शिपाई : वरं झालं त्या बिचाऱ्या मसाजीला शिक्षा केली नाही. अरे पण त्याला आज ना उद्या शिक्षा होईलच की !

पहिला शिपाई : ते पण खरंच आहे म्हणा, आता आपण तरी काय करणार ? आपले महाराज चक्रम डोक्याचे आहेत. चल बाबा

आपली चाकरी आपण सांभाळू. नाहीतर आपली हकालपट्टी व्हायची.

दुसरा शिपाई : खरंच ना, आपल्या महाराजांचं काही खरं नाही, आपलं काम करू. आपल्याला काय दिवस–रात्र पुरणार नाही बोलायला.

(दोघे शिपाई निघू लागतात, तोच पंडितमहाराज हातामध्ये कुंडली घेऊन प्रवेश करतात.)

पहिला शिपाई
दुसरा शिपाई } : पंडीत महाराजांचा विजय असो !

पंडित : शुभ प्रभातम् . . . शुभ प्रभातम् . . . !

पहिला शिपाई : पंडित महाराज आपण वाट चुकलात की काय ?

दुसरा शिपाई : हो ना, कुंडली घेऊन या वेळेस तुम्ही महाराजांबरोबर असायचे आणि आज मात्र तुम्ही आपल्या नगराच्या बाहेर निघालात.

पंडित : हो निघालो, सर्व सोडून आता कुठेतरी आडरानात जाऊन समाधी लावतो. महाराजांना सांगितलेलं सर्व भविष्य खोटं निघालं. त्यामुळे महाराज माझ्यावर नाराज आहेत.

प. शिपाई : अहो महाराजांचे ग्रह फिरले. आता त्याला तुम्ही काय करणार ?

दु. शिपाई : महाराज जसे कर्म करणार तसेच भोगणार.

पंडित : पण मांजराच्या गळ्यात घंटा कोणी बांधावी ? तो डमरू राक्षस महाराजांच्या मागे हात धुवून लागला आहे.

प. शिपाई : हो, त्या डमरू राक्षसाच्या विरुद्ध तर दवंडी पिटवून आम्ही निघालोच.

दु. शिपाई : त्या डमरू राक्षसाने म्हणे चार शास्त्रज्ञ निर्माण केलेत. त्यांना पळवून लावण्यासाठी महाराजांनी अर्धे राज्य आणि त्यांची कन्या बक्षीस ठेवली आहे.

पंडित : ते शक्य नाही. हे काम करण्यासाठी स्वर्गातून देव अमृत घेवून आले पाहिजेत.

प. शिपाई : बरं ते जाऊ द्या. पंडित महाराज बरेच दिवस झाले भविष्य पहाण्याची इच्छा आहे. आपलं तेवढं भविष्य सांगा ना.

पंडित : अरे हो, सांगतो. पण पहिल्यांदा दक्षिणा काढा. कारण सध्या महिनाअखेर आहे.

प. शिपाई : अहो इथं विष खाण्यासाठी जवळ एक दिमडी नाही. तर दक्षिणा कुठून आणणार ?

दु. शिपाई : दोन महिने झाले, पगारच झाला नाही, म्हणे खजिन्यातील सर्व रक्कम संपली. घरी सर्वजण उपाशी मरू लागलेत. अन् इकडं तुम्हाला कुठली द्यायची दक्षिणा ?

पंडित : अरे बाबांनो. माझी पण झोळी रिकामीच आहे. आता उपाशी राहण्याची वेळ येऊ नये म्हणून निघालोय !

प. शिपाई : (दुसऱ्या शिपायला) अरे बाबा, पंडित महाराजांनाच त्यांच्या भविष्यात काय घडणार आहे ते माहीत नाही, तेव्हा ते आपल्याला काय भविष्य सांगणार ?

दु. शिपाई : बरोबर आहे, चल बाबा !

प. शिपाई<br>दु. शिपाई } : राम, राम, निघतो आम्ही !

(दोघे निघून जातात, पंडित पाहात राहतो. हळूहळू अंधार.)

## प्रवेश दुसरा

(घनदाट जंगलाचे दृश्य. घनदाट जंगलात मध्यभागी राजपुत्र बसला आहे. त्याच्या उजव्या बाजूस दोघे आणि डाव्या बाजूला दोघे असे चौघे परदेशी मानव थांबले आहेत. तेवढ्यात डमरू राक्षसाचा आवाज ऐकू येतो.)

राक्षस : (हासत) हाः...हाः...हाः..., डम डम डमरू...डम डम डमरू ! हाः...हाः...हाः... !

(राक्षसाचा आवाज ऐकून राजपुत्र घाबरतो.)

राजपुत्र . कोण? डमरू राक्षस ? कोठे आहात हो तुम्ही ? अहो डमरू-काका, सोडा ना मला. मी तुमच्या पाया पडतो. मला सोडा ना. मी काय वाईट केलंय तुमचं ? मला का या जंगलात पळवून आणलंय ? मला सोडा ना.

राक्षस . घाबरू नकोस, बाळ. घाबरू नकोस ! आम्ही तुला काहीही करणार नाही. तुझे वडील जेव्हा सरळ मार्गावर येतील तेव्हाच आम्ही तुला सोडू. तोपर्यंत तू येथेच राहशील. तुला आम्ही काहीही कमी पडू देणार नाही. तुला पाहिजे ते माग, मी आणून देतो, आणि तुम्ही असे चौघेजण माना खाली खालून का उभे राहिलात ?

सर्वजण : (एका स्वरात) सरकार आम्हाला पळवून लावण्यासाठी चक्रमसिंह राजाने खूप मोठे इनाम ठेवले आहे.

राक्षस : (हासत) हा:...हा:...हा: ! म्हणून घाबरलात काय ? मी जाणतो की, त्या चक्रमसिंह राजाने तुम्हाला पळवून लावण्या-साठी त्याने त्याची कन्या व अर्धेराज्य बक्षीस ठेवले आहे. पण तुम्ही घाबरू नका. तुम्हाला कोणीही काहीही करणार नाही. तुम्ही हासत–खेळत दिवस घालवा. त्या मुलाला मात्र त्रास देऊ नका. ऊठ बाळ. ऊठ. असा नाराज होऊन बसू नकोस. आम्ही तुला एक दिवस नक्की मुक्त करू. ऊठ ! हासत खेळत दिवस घालव उठा, मित्रांनो उठा, चला. तुम्हीपण हसा, खेळा, मजा करा ! हा:...हा:...हा:... डम डम डमरू... डम...डम...डमरू...

(डमरू राक्षस अदृश्य होतो. चौघे मानव विशिष्ट नृत्य करीत त्या राजपुत्राचे मनोरंजन करतात. राजपुत्रही त्यांच्याभोवती नाचू लागतो.)

राजपुत्र : खरंच तुम्ही किती चांगले आहात हो ? तुम्ही किती छान नाचता ? (अचानक रडू लागतो.) अं...अं. .अं...)

जपानी : अरे, असं तुला अचानक रडायला काय झालं ?

राजपुत्र : मला...मला माझ्या ताईची आठवण आली.

रशियन . ताई ? कोण ताई ?



राजपुत्र

[illegible]

जर्मन : अरे, ताई म्हणजे बहीण ! याला याच्या वहिणीची आठवण झाली म्हणतोय.

राजपुत्र : हो ! मला माझ्या वहिणीची आठवण झाली. माझी ताई आणि मी बागेत असेच खेळायचो. बागडायचो. माझी ताई आणि माझे बाबा काय करत असतील हो आता ? अहो, चला ना माझ्या घरी घेऊन मला, चला ना, तुमचे माझ्यावर खूप खूप उपकार होतील. चला ना माझ्या घरी घेऊन मला. चला ना.

जपानी : अरे वा...वा... शहाणाच दिसतोय की, तुझ्या घरी तुला घेऊन गेल्यावर आमचे सरकार आम्हाला रागावतील ना.

फ्रेंच : (सर्वांना बाजूला घेऊन) अरे, आपण असे करू या ना. आपणच या मुलाच्या वडिलांकडे म्हणजे चक्रमसिंह राजाकडे जाऊन त्याला एकदाचीच चांगली अद्दल घडवू आणि एकदाचेच या कटकटीमधून मोकळे होऊ.

रशियन : हो, बरोबर आहे. तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. आपण असेच करू या.

सर्वजण : हो, हो. चला चला ! (सर्वजण निघू लागतात तोच जर्मन मानव सर्वांना थांबवतो.)

जर्मन : अरे थांबा, थांबा ! आपण सर्वजण तिकडे निघून गेल्यावर मग एवढ्या मोठ्या घनदाट जंगलात हा एकटा कसा राहील ? घाबरेल ना.

फ्रच : मग आपण असे करू. (जर्मन व रशियन मानवाकडे बोट दाखवून) तुम्ही दोघेजण त्या चक्रमसिंह राजाकडे जाऊन त्याला सरळ मार्गावर आणा. आम्ही दोघे या राजपुत्राच्या सोबतीला थांबतो.

रशियन : ठीक आहे. तू म्हणतोस तसंच करू या ! (राजपुत्राकडे पहात) हे बघ, तू येथेच थांब. तुझ्या सोबतीला हे दोघेजण आहेत. आम्ही तुला लवकरच तुझ्या घरी घेऊन जाऊ.

राजपुत्र : खरंच का हो, तुम्ही मला माझ्या घरी घेऊन जाल ? मग

तुमचं माझ्यावर खूप खूप उपकार होतील तुम्ही लवकर या वरं का !

जर्मन : हो हो ! तू घाबरू नकोस, आम्ही आत्ता आलोच.

(दोघे निघून जातात. अंधार.)

## प्रवेश तिसरा

(घनदाट जंगलाचे दृश्य. त्या घनदाट जंगलात एका झाडाखाली ससाजी विचार करीत बसला आहे.)

ससाजी (स्वगत–दुःखी होऊन) : त्या चक्रमसिंह राजानं माझ्या जीवलग मित्राला, मसाजीला कडयावरून ढकलून देण्याची आज्ञा दिली. आता कुटं शोधू माझ्या मित्राला. त्या चक्रमसिह राजानं माझ्या मित्रावर अन्याय केलाय. मी आता त्या चक्रमसिंह राजाला माझा इंगा दाखविल्याशिवाय ऱ्हाणार नाही.

पण...पण... आपण त्या चक्रमसिह राजाचा काटा कोणत्या मार्गानं काढायचा. तो तर हृचा मोठ्या डमडम नगराचा राजा हाये. त्याच्या हातात मोठी सत्ता हाय. त्याच्याजवळ मोठं सैन्य हाय. मग आपण यकटं काय करनार ?

(तेवढ्यात जंगलातील डमरू राक्षसाचा आवाज ऐकू येतो.)

डमरू राक्षस : (हासत) हाः...हाः...हाः... डमडम डमरू.

ससाजी : (घाबरून) क...क...कोण ? ड...डमरू रा...रा. राक्षस ?

डमरू राक्षस : हो ! मीच तो डमरू राक्षस ! या जंगलाचा राजा. पण तुला घाबरण्याचं काहीही कारण नाही. मी तुझे सर्व दुःख जाणतो. हे बघ, जर तुला या चक्रमसिंह राजाचा काटा काढायचा असेल, तर मी सांगतो तसेच तू वागले पाहिजेस. म्हणजे तुला नक्की यश प्राप्त होईल. समजलं ?

ससाजी : होय समजलं ! तुम्ही सांगाल त्याचपरमाणे मी वागेन !

डमरूराक्षस : त्या चक्रमसिंह राजाचा तुला काटा काढायचा ना, मग पहिल्यांदा तू त्या परदेशी मानवांना जाऊन भेट. म्हणजे ते तुला पाहिजे ती मदत करतील.

ससाजी (घाबरून) : क्.. क्. काय ? मी...मी त्या . परदेशी मानसांना भेटू ? नको रं बाबा, आपल्याच्यानी त्ये जमायचं न्हाय. मला त्यांची लई भिती वाटते. आहो, माझ्या दोस्ताला त्या परदेशी मानसांनी उचलून हौदात फेकून दिलं व्हतं. त्ये खूप डेंजर मानसं हाईत. तवा आपण त्यांना भेटणार न्हाई.

डमरू राक्षस : (हासत) हा ...हा:...हा:... अरे मानव प्राण्या, असा घावरू नकोस ! त्यांना तू फक्त माझं नाव सांग, म्हणजे ते तुला काही करणार नाहीत. त्यांना तुझे काम सांग. ते तुला जरूर मदत करतील.

ससाजी : खरंच त्ये मला मदत करतील ? अहो, मग सांगा ना मला त्ये आता कोणत्या ठिकानी भेटतील ?

डमरू राक्षस : ते तुला येथून थोड्याच दूर अंतरावर जंगलाच्या पलीकडे एका गर्द झाडीत भेटतील. मी सांगतो त्या मार्गाने तू त्यांना शोधत जा. ह वघ, येथून सरळ जायचं. डाव्या हाताला वळायचं, मग उजव्या हाताला वळायचं आणि पुन्हा नाकासमोर सरळ जायचं. पुन्हा उजव्या हाताला वळून डावीकडं जायचं. मग तिथे एक छोटा ओढा लागेल. तो पार केला की. पुन्हा सरळ जाऊन उजव्या हाताला वळायचं. तिथे खूप गर्द झाडी दिसंल. ते तुला तेथेच भेटतील, तर जा. वेळ घालवू नकोस. तू यशस्वी होशील. (हासतो) हा:. .हा:. . .हा:. . . डमडम डमरू !

ससाजी : (डोके खाजवीत) उजव्या हाताला... मग सरळ. पुन्हा उजव्या डाव्या आणि मग ? अगऽ. गऽ. गऽ. हा तर लय कठीन मारग दिसतोय बुवा. माझ्या तर डोसक्यात काय पन बसलं नाय, बरं चला, शोधून तर पाहू. सांपडलं तर सापडलं. नाहच सापडलं तर नाहच.

(ससाजी उजव्या विंगेतून प्रवेश करतो ससाजी थकलेल्या अवस्थेत आहे.)

बापरे रे ! चालून चालून पाय दुखू लागलं. सर्व जंगल ना जंगल पालथं घातलं, पन त्या परदेशी मानसांचा काही पत्त्या

लागला न्हाय. (स्वगत) आता असं दुसऱ्याच्या भरोशावर बसून चालायचं न्हाई. काय तरी हालचाल केलीच पायजे. काय व्हईल त्ये जाईल. पन त्या चक्रमसिंह राजाला मात्र धडा शिकिवलाच पायजे. मी सोता जाऊन त्याला चांगलीच अद्दल घडिवतो. मी आता शांत बसनार नाई. मी त्येला सरळ मार्गावर आनल्या-बिगर मला चैन पडनार न्हाई.

(ससाजी निघून जातो. अंधार.)

## प्रवेश चौथा

(राजमहालाचे दृश्य. राजमहालामध्ये चक्रमसिंह राजा मण्यांची माळ हातात घेऊन देवाचे स्मरण करण्यात मग्न आहे.)

चक्रमसिंह : ओम नमोः शिवाय... ओम नमोः शिवाय...
ओम नमोः शिवाय . ओम नमोः शिवाय...
ओम नमोः शिवाय... ओम नमोः शिवाय ..
(तेवढ्यात एका शिपायाचा प्रवेश.)

शिपाई १ : महाराजांचा जय जयकार असो !

चक्रमसिंह : (देवाचे स्मरण करण्यात मग्न आहे.) ओम नमोः शिवाय ओम नमोः शिवाय...

शिपाई १ : (महाराज ऐकत नाहीत असे पाहून चक्रमसिंह महाराजांच्या कानाजवळ जाऊन मोठ्याने ओरडतो.)
महाराजांचा जय जयकार असो.

चक्रमसिंह : (दचकून) ओम नमोः शिवाय ओम नमो शिवाय ..
काय रे गाढवा, आमच्या तपस्येचा भंग करतोस ?

शिपाई : क्षमा असावी महाराज, आपल्या राजकन्येची दासी काही महत्त्वाचा संदेश घेऊन आली आहे.

चक्रमसिंह : ठीक आहे त्यांना आत पाठवून द्या.
(शिपाई निघून जातो. पाठोपाठ दासी प्रवेश करते.)

दासी : महाराजांचा जयजयकार असो !

चक्रमसिंह : बोला. काय संदेश आहे ?

दासी : महाराज आपल्या राजकन्या जेवण न घेता तशाच रडत वसल्या आहेत.

चक्रमसिंह : काय ? जेवण न घेता रडत बसली आहे. काय वरं झालं तिला रडायला ? असं करा. तिला माझ्याकडे पाठवून द्या.

दासी : जशी महाराजांची आज्ञा (दासी निघून जाते आणि पाठोपाठ राजकन्येला घेऊन येते.)

राजकन्या (रडत प्रवेश करते.) : अं...अं अं...

चक्रमसिंह : बेटा, असं एकाएकी रडायला काय झालं तुला ? सांग ना असं रडतेस का ? कुणी रागावलं का तुला ?

राजकन्या (रडक्या स्वरात) न: ही बाबा, मला विक्रमभाऊची सारखी आठवण येते. बाबा सांगा ना, विक्रमभाऊ कुठं गेला आहे ? त्याला जोपर्यंत तुम्ही घेऊन येणार नाही तोपर्यंत मी जेवणारच नाही. (रडू लागते.) अं अं ..अं ..
(वरील संवाद चालू असतानाच जपानी व फ्रेंच ही परदेशी माणसे राजमहालात येऊन गुपचूप संवाद ऐकत थांबतात. तेवढ्यात ससाजी हातामध्ये तलवार घेऊन राजमहालात प्रवेश करतो.)

ससाजी : कुठं गेला तो समाजद्रोही चक्रमसिंह राजा ? मी आता त्याला या जगातून न्हाईसा करनार हाये.
(असे म्हणत तो चक्रमसिंह राजाच्या अंगावर धावून जाणार तोच मागे थांबलेले फ्रेंच आणि जपानी मानव ससाजीला मागे ओढतात. राजकन्या घाबरून चक्रमसिंह राजाच्या मागे लपते.)

चक्रमसिंह (घावरून) : कोण ? ससाजी ? काय रे हरामखोरा, काय काम आहे तुझं इथं ? आणि कुणाला विचारून आत आलास ? कोणी सोडलं तुला आत ?

ससाजी : चक्रमसिंह राजे, आता मला कुणी देखील अडवू शकनार न्हाईत. समजलं ? पन आता तुमच्या पापाचा घडा भरल्याला दिसतोय, तुमी खूप निरपराध लोकांचा छळ केला हाये. तवा आता मुकाट्यानं मरायला तयार व्हा.

चक्रमसिंह : काय ? तू मला मारणार ? (हासतो.) हा: हा:... हा:... ! ससाजी, अरे आत्तापर्यंत आम्ही चांगल्या चांगल्या लोकांना वाटेला लावलंय आणि तू मला मारणार ? पण माझ्या अगोदर तूच परमेश्वराच्या घरी जाशील, समजलं ? (शिपायांना बोलावतात.) शिपाई शिपाई... !

(हातामध्ये तलवार घेऊन दोन शिपाई प्रवेश करतात.)

धरा त्या हरामखोराला आणि मुडकं छाटून काढा हरामखोराचं. जिवंत सोडू नका त्याला.

(दोन्ही शिपाई ससाजीच्या अंगावर धावून जातात. तेव्हा थांवलेले फ्रेंच आणि जपानी मानव ससाजीला सोडून देतात व एका शिपायाला धरून ठेवतात. इकडे ससाजीची दुसऱ्या शिपायावरोबर तलवारीने लढाई सुरू होते. शेवटी दुसरा शिपाई घावरून पळून जातो. फ्रेंच व जपानी मानव पहिल्या शिपायाला सोडून देतात. तो अधिकच घावरून पळून जातो.)

ससाजी (चक्रमसिंह राजाच्या गळ्याजवळ तलवार नेत बोलतो.): आता बोला चक्रमसिंह राज्ये, आता तुमचा परमेश्वर तुमच्या येण्याची वाट पाहतोय. तवा निगण्याची तयारी करा.

(ससाजी चक्रमसिंह राजाच्या अंगावर मारण्यासाठी धावून जाणार तोच मागे थांवलेले फ्रेंच आणि जपानी मानव ससाजीला धरून मागे खेचतात. पण ससाजी चक्रमसिंह राजाच्या अंगावर

धावून जाण्यासाठी, त्याला मारण्यासाठी स्वतःची सुटका करून घेण्याचा प्रयत्न करतो.)

तुम्ही मला सोडा. मी आता या विक्रमसिंह राजाला जिवंत सोडणार न्हाय ! यानं लय लोकांचा छळ केला हाय. मी त्येला ठार मारल्याशिवाय स्वस्थ बसणार न्हाय.

(ससाजी फ्रेंच आणि जपानी मानव यांच्या तावडीतून सुटून महाराजांच्या अंगावर धावून जाणार तोच राजकन्या ससाजीला आडवते.)

राजकन्या : नका हो, नका, माझ्या बाबांना मारू नका. मी तुमच्या पाया पडते. माझ्या बाबांना मारू नका, अहो, असे आमच्या पाठीमागे का लागलात ? माझ्या विक्रमभाऊला पण पळवून नेलं आहे आणि आता माझ्या बाबांना तुम्ही मारता. मग मला पण जिवंत ठेवू नका. मला पण ठार मारा, असे पाहतो काय ससाजी ? मार ना मला.

ससाजी : न्हाई, छोटया रानीसायेब, मी यवढा क्रूर न्हाई, तुमच्या वडिलांना उगीचच मारायला. पण तुमच्या बाबांनी माझ्या बेकसूर आजोबानला तुरुंगात डांबून ठिवलं हाये. कित्येक निरपराद गरीब लोकास्नी त्येचा कायबी गुन्हा नसताना, त्येंना तुरुंगात डांबून ठिवलंय आणि शिरमंत लोक आणि दरबारामधील मंत्री संत्रीनी वाटेल तसा गोंधळ घातला तरी त्येंना शिक्षा व्होत नाय. गरीबांस्नी येगळा कायदा आन् शिरीमंतांना येगळा कायदा ह्यो कसला तुमचा न्याय ?

राजकन्या : ऐकलंत बाबा, ऐकलंत ? तुमच्या या वागण्यामुळे आज केवढं मोठं संकट उभं राहिलं आहे. नगरामधील लोकांचा सुद्धा तुमच्यावरचा विश्वास नाहीसा झालाय.

जर्मन : तुमचं म्हणणं अगदी बरोबर आहे. नगरातील सर्व लोक वैतागलेले आहेत.

रशियन : नगरातील सर्व लोकांना तुम्ही नकोसे झाला आहात. तुम्ही हा

राज्यकारभार दुसऱ्यांच्या हवाली करावा असं त्यांना वाटतं. त्यांना चांगला नवा राजा हवा आहे.

चक्रमसिंह : अरे पण तुम्ही कोण आहात ?

जर्मन : आम्ही डमरू राक्षसाचे सेवक आहोत.

रशियन : आम्ही चार परदेशी मानवांपैकी दोघे आहोत.

चक्रमसिंह : काय ? तुम्ही डमरू राक्षसाचे सेवक परदेशी मानव ?

ससाजी : खरंच का वो तुमीच परदेशी मानव हात ?

जर्मन : हो आम्हीच ते परदेशी मानव. या चक्रमसिंह राजाला सुधारण्यासाठी आम्हाला इकडे आणण्यात आलं आहे.

राजकन्या : अहो, तुम्हीच माझ्या विक्रमभाऊला पळवून नेलंत ना ? कुठं आहे तो ? सांगा ना ? तुम्ही मागाल ते आम्ही तुम्हाला देऊ पण माझ्या विक्रमभाऊला सोडा ना.

रशियन : तुम्ही घाबरू नका, आमचे दोघे साथीदार तुमच्या विक्रमभाऊजवळ बसले आहेत. जोपर्यंत महाराज सरळ मार्गावर येत नाहीत तोपर्यंत आम्ही त्याला सोडणार नाही.

ससाजी : पाहिलंत चक्रमसिंह राजे. तुमच्या वाईट करणीबद्दल कित्येक लोकांच्या मनात तुमच्या इरूद्ध चीड हाये. तुमी माझा जिवलग मित्र मसाजीला सुद्धा कडेलोटाची शिक्षा फर्मावली. का तर त्येनं तुम्हाला राज्यकारभाराविषयी तुमच्या मनाइरूद्ध सल्ला दिला म्हून. तुमी रातं–दिवस राज्यकारबाराकडे दुर्लक्ष करून तीर्थयात्रा करत हिंडता. देवाच्या नावाखाली राज्याच्या तिजोरीतल्या लाखो रुपयांची वाट लावता. पण इकडं परजेच्या गैरसोयी मातर तुमाला दूर करता येत न्हाईत. चक्रमसिंह राजे तुमाला या राजमहालात राहून गरीब लोकांचं दुख कळणार न्हाई. त्येंच्या झोपडीत जाऊन ऱ्हावा म्हंजी तुमाला त्येंची दुःखे कळत्याल.

चक्रमसिंह : खरंच बरोबर आहे. मी एवढ्या दिवस काय करीत होतो, याचे मला भानच नव्हते. परंतु ससाजी मला माफ कर, मी आत्तापर्यंत खूप चुका केल्या आहेत. खरोखरच माझ्यामुळे बऱ्याच

लोकांना हाल सोसावे लागले आहेत. मी खूपच मोठे पाप केले आहे. तुम्ही सर्वांनी माझे आज डोळे उघडले आहेत. मी पुन्हा कोणाला त्रास होईल असे कृत्य करणार नाही.

रशियन : ठीक आहे. आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवतो की तुम्ही यापुढे व्यवस्थित राज्यकारभार चालवाल, असा निरोप आम्ही डमरू राक्षसाला कळवतो. म्हणजे ते तुमच्या राजपुत्राला मुक्त करतील.

चक्रमसिंह : (मायेने जवळ येत) माझा विक्रमबेटा कुठे आहे हो ? तो सुरक्षित तर आहे ना ?

जर्मन : तो आमच्याकडे आहे. तुमाला अद्दल घडविण्यासाठी आम्ही हा डाव रचला होता. आम्हीच त्याला बागेमधून पळवून नेलं होतं.

रशियन : जोपर्यंत तुम्ही सुधारणार नाही, तोपर्यंत राजपुत्राला सोडायचे नाही असा आमच्या सरकारचा म्हणजे डमरू राक्षसाचा हुकूम आहे.

चक्रमसिंह : खरंच, त्या डमरू राक्षसाचे माझ्यावर खूप उपकार आहेत. त्याच्यामुळेच आज माझे डोळे उघडले. कोठे आहे डमरू राक्षस?

जर्मन : ते जंगलामध्येच आहेत !

चक्रमसिंह : तुमच्या सरकारला—डमरू राक्षसाला मी खूप त्रास दिला. त्याबद्दल मी त्यांची माफी मागतो आणि आता येथून पुढे सर्वांना समान वागणूक देईन सर्वांना योग्य तो न्याय देईन.

जर्मन : उशिरा का होईना पण तुमची चूक तुमच्या लक्षात आली. आता ओम नमोः शिवाय करीत वेळ घालवू नका.

रशियन : तुम्ही व्यवस्थित राज्यकारभार चालवा आणि प्रजेच्या गैर-सोयी दूर करा. सर्व प्रजेचा विश्वास पुन्हा संपादन करा.

चक्रमसिंह : काय मी राज्यकारभार चालवू ? नाही नाही. ते आता शक्य नाही. आता मी मागे दवंडी पिटवल्याप्रमाणे अर्धे राज्य माझ्या विक्रमाला आणि अर्धे राज्य ससाजीला दिले असे जाहीर करतो.

(सर्वजण टाळ्या वाजवतात.) चक्रमसिंह महाराज शिपायांना बोलावतो शिपाई... शिपाई...

प. शिपाई : आज्ञा असावी महाराज.

चक्रमसिंह : डमडम नगरातील सर्व रहिवाशांना कळवा की, आजपासून डमडम नगराचा राज्यकारभार ससाजी चालवणार आहेत. ते आजपासून या नगराचे राजे आहेत. यापुढे त्यांच्या आज्ञेप्रमाणे सर्व कारभार चालेल. जा ! सर्व नगरात दवंडी देऊन सर्वांना हा संदेश कळवा.

प. शिपाई : जशी महाराजांची आज्ञा (निघून जातो.)

ससाजी : क् . . क् ... काय ? मी ... मी डम् ... डम् नगराचा राजा, नको रे बाबा, आपल्या हातून नाय जमायचं.

(ससाजी पळून जाण्याचा प्रयत्न करतो, तोच चार मानव त्याला आडवतात.)

चक्रमसिंह : ससाजी, तुला हे स्वीकारायलाच लागेल.

ससाजी : अवो, पन पन.

दोघेजण : पण बिण काही नाही. तुला हे स्वीकारावेच लागेल.

ससाजी : आवो, पन मी, गरीब मानूस हाये.

चक्रमसिंह : ससाजी तू गरीब जरी असलास तरी हुशार आणि शहाणा आहेस. शिवाय तू प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ आहेस. तुला गरीब जनतेची दुःखे कळतात. तू नवजवान आणि बहादुर आहेस. कोणत्याही मोठ्या राजाला लाजवतील असे तुझ्या अंगात चांगले गुण आहेत. तेव्हा तू खराखुरा राजा शोभतोस. म्हणून मी तुझ्या बहादुरीवर आणि बुद्धिमत्तेवर खूष होऊन मी तुला आज डमडम नगराचा राजा ही पदवी बहाल केली आहे.

ससाजी : आवो, पन . पन...

जर्मन : पण बीण काही नाही. तुला हे स्वीकारावेच लागेल.

रशियन : तू या डमडम नगराचा राजा झालाच पाहिजेस.

जर्मन : तुला हे मान्य केलेच पाहिजे.

रशियन : हो, हो तुला हे सर्व मान्य करायलाच पाहिजे.

ससाजी : ठीक हाय, तुम्ही सर्वेजण या डमडम नगराच्या राज्याची सूत्रे मोठ्या इश्वासाने माझ्यावर सोपवत हात, मी तुमचा आदर-पूर्वक मान राकून राज्याची सूत्रे हातात घेतो आणि सर्वांना वचन देतो की, मी डमडम नगराचा कारबार पारमाणिकपणाने पार पाडीन.

चक्रमसिंह : ठीक आहे ससाजी ! तर तू आता लाग तुझ्या कामाला. आमचा आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहे.

(सर्वजण टाळ्या वाजवतात– हळू हळू अंधार.)

## प्रवेश पाचवा

(राजमहालाचे दृश्य. राजमहालात चक्रमसिंह महाराज व ससाजी आहेत, तेवढ्यात पडद्यामागून दवंडी दिल्याचा आवाज ऐकू येतो.)

आवाज : ऐका…हो ऐका.. ! आपल्या डमडम नगराचे महाराजे चक्रमसिंह यांच्या आज्ञेवरून कळविण्यात येते की, आजपासून आपल्या डमडम नगराचे नवे महाराजे ससाजी झाले असून, त्यांच्या हाती सर्व राज्यकारभाराची सूत्रे सोपविण्यात आली आहोत हो… !

चक्रमसिंह : ससाजी मी आपणास आपल्या बुद्धिमत्तेवर आणि बहादुरी-वर खूष होऊन आपल्या हातात डमडम नगराचा राज्य-कारभार सांभाळण्यासाठी दिला आहे. तेव्हा तुम्ही आजपासून प्रजेच्या ज्या काही गैरसोयी असतील त्या समजावून घेऊन व्यव-स्थित राज्यकारभार चालवावा.

ससाजी : होय म्हाराज, मी तुम्हाला वचन देतो की, मी या नगरातील लोकांना योग्य तो न्याय देईल. त्यांच्या काही गैरसोयी आसतील

त्या दूर करील. आणि जो कोणी भेदभाव पाळील, जो कोणी देवाधर्मासाठी भांडणे करील त्येला मी कठोर शिक्षा करील.

चक्रमसिंह : शाब्बास ससाजी, शाब्बास ! मला पण असाच राजा हवा होता. तर तू आता लाग तुझ्या कामाला.

ससाजी : पण म्हाराज, परधानजी हल्ली दिसत नाही हो ?

(तेवढ्यात पडद्यामागून ललकारी दिल्याचा आवाज ऐकू येतो.)

ललकारी : होशियार.. ! सावधान. . ! डमडम नगराचे प्रधानजी महाराज दरबारात प्रवेश करीत आहेत हो...

(प्रधानजी महाराज प्रवेश करीत असताना पुन्हा एकदा ललकारीचा आवाज येतो.)

ललकारी : होशियार... सावधान... ! डमडम नगराचे प्रधानजी महाराज दरबारात प्रवेश करीत आहेत हो... !

प्रधानजी : हरि . . . हरि . . . ! हरी . . . हरी . . . ! (चक्रमसिंह महाराजांकडे पहात) महाराजांचा जयजयकार असो ! (ससाजी कडे पाहून दचकतो व रागावतो.) ससाजी, गाढवा तुझी ही हिम्मत ? आमच्या समोर सिंहासनावर बसतोस ? लाज नाही वाटत तुला ? अरे गाढवा, सिंहासनावर बसण्यासाठी लायकी लागते लायकी. समजलं ?

ससाजी . परधानजी बुवा, मला पहिल्यांदा सांगा की, तुमी एवढ्या दिवस राज्यकारभार सोडून कुठं हिंडत व्हता ?

प्रधानजी (चिडून) : हरी हरी...! हरी...हरी ! अरे गाढवा तुला माहीत नाही का, मी या डमडम नगराचा कोण आहे ते ? मी या डमडम नगराचा प्रधानजी आहे. आमच्या हुकुमाप्रमाणे येथील सर्व कारभार चालतो आणि तू मला उलट सुलट प्रश्न विचारतोस ?

ससाजी : व्हय परधानजी बुवा, मी तुमालाच प्रश्न इचारतोय समजलं. राज्यकारबार पाहयचं सोडून हरी . हरी करीत हिंडता, पाण्या-परमाणे पैशाचा नाश करता, तुम्हाला लाज नाही वाटत ?

प्रधानजी (रागात) : ससाजी !

ससाजी : खामोश !

प्रधानजी (अधिक चिडून) : हरी.. हरी...! हरी...हरी...! अरे गाढवा, तुझी ही हिम्मत, थांब तुला बरोबर वळणावर आणतो, तुझी जीभ छाटून काढतो. (शिपायांना बोलावतो.) कोण आहे रे तिकडे ? शिपाई, शिपाई ! (दोन शिपाई प्रवेश करतात.) पकडा या हरामखोराला. आम्हाला उलट सुलट बोलतोय, आम्हाला शहाणपण शिकवतोय. धरा त्याला. सोडू नका, जीभ छाटून काढा त्याची.

(दोघे शिपाई जागेवरून न हालता, तसेच माना खाली घालून थांबतात.) हरी हरी.. ! हरी...हरी ! अरे गाढवांनो, असे माना खाली घालून काय थांबलात ? धरा त्या हरामखोराला आणि जीभ छाटून काढा त्याची.

ससाजी : परधानजी बुवा आता खूप झाली तुमची नाटकं. आता इथून पुढं अशी नाटकं करून चालायचं न्हाई. समजलं ? न्हाईतर तुमची डायरेक्ट कत्तल केली जाईल. काय ? मला या डमडम नगराचा राजा म्हणतात राजा !

प्रधानजी : काय म्हणालास ? या डमडम नगराचा राजा ? (हासतो) हाः...हाः...हाः... तू आणि या डमडम नगराचा राजा ? (पुन्हा हासतो) हा...हा...हा... महाराज, हा वेडा काय म्हणतोय ऐकलंत ?

चक्रमसिंह : हो, डमडम नगराचा राजा ! प्रधानजी ससाजीस आम्ही स्वखुषीने त्याच्या कामगिरीवर खूष होऊन ‘ डमडम नगराचा राजा ’ ही पदवी बहाल केलीय तेव्हा तुम्ही त्यांना चांगले सहकार्य करावे. (चक्रमसिंह राजे निघून जातात.)

प्रधानजी : काय म्हणालात ? ससाजी या डमडम नगराचा राजा ? हरी...हरी. .! हरी ..हरी ! (रडू-लागतो) अं...अं ..अं... हरी...हरी. ! हरी. .हरी !

ससाजी : खामोश ! आजपासून राज्याच्या तिजोरीमधील पैशानं तीर्थयात्रा वगैरे करणं सर्व बंद ! समजलं ?

प्रधानजी : पण...पण...महाराज

ससाजी : एक शबुद बी बोलू नको. इकडे नगरात काळाबाजार चाल- लाय, चोऱ्या व्हत्यात, गरीब लोक लुबाडलं जात्यात, म्हागाई मरणाची वाढली हाय आणि तुमी मातर इकडं ऐषआरामात गरीब लोकांच्या पैशावर वाटेल तसे नाचता !

(तेवढ्यात एका शिपायाचा प्रवेश.)

शिपाई : महाराजांचा जयजयकार असो !

ससाजी : बोला ! काय खबर आनलीत ?

शिपाई : महाराज आपल्या राजवाड्याबाहेर लोकांची खूप गर्दी जमली आहे.

ससाजी : लोकांची गर्दी ? का ? कशासाठी ?

शिपाई : महाराज आपल्या दरबारात नेहमीच्या रिवाजाप्रमाणे दर महिन्याला दरबार भरवून लोकांच्या काही तक्रारी, गाऱ्हाणी वगैरे असतील तर त्याचे निरसण करून योग्य तो न्याय देण्याचा रिवाज आहे, पण पण .. (शिपाई प्रधानाकडे पाहून गप्प बसतो.)

ससाजी : पन काय ? बोला ना, घाबरायला काय झालं ? बोला.

प. शिपाई (पुन्हा प्रधानजीकडे पाहून गोंधळतो) : पण...पण ..

ससाजी : पन हेच ना, कि परधानजी बुवांच्या गैरहजेरीमुळं आणि चक्रमसिंह म्हाराजांच्या दुर्लक्षामुळं आजपर्यंत दरबार भरवलाच नाही.

शिपाई : होय महाराज ! तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे. तुमच्या नावाची कीर्ती ऐकल्यापासून लोक न्याय मिळविण्यासाठी तडफडत आहेत.

ससाजी : ऐकलंत परधानजी ! गरीब लोक आपल्या हक्कासाठी आणि न्यायासाठी तडफडत आहेत आणि तुमी खुशाल त्या गरीब

लोकांचा पैसा वाटेल तसा भंडाऱ्यापरमानं उधळत हिंडता, तुमच्या सारख्या लोकांस्नी कठोर शिक्षा करायला हवी.

(शिपायाकडे पहात) शिपाई ज्या लोकांच्या काही तक्रारी आसतील त्येंना सर्वांना तावडतोब दरबारामंधी हजर करा.

प. शिपाई : जशी महाराजांची आज्ञा !

(शिपाई निघून जातो. तोच पडद्यामागून आवाज ऐकू येऊ लागतो.)

आवाज : डमडम नगराचे नवे महाराजे ससाजी यांचा जयजयकार असो. आपले नवे महाराज ससाजी दरबार भरवून न्यायदानाच्या कामास सुरुवात करीत आहेत हो ... !

(राजवाड्याबाहेरून लोकांचा आरडाओरडा ऐकू येऊ लागतो. पुन्हा एकदा आवाज ऐकू येतो.)

आवाज : डमडम नगराचे नवे महाराजे ससाजी यांचा जयजयकार असो. आपले नवे महाराज ससाजी दरबार भरवून न्यायदानाच्या कामास सुरुवात करीत आहेत हो ... !

(राजवाड्यावाहेरून पुन्हा लोकांचा गलका–आरडा–ओरडा ऐकू येऊ लागतो.)

ससाजी : परधानजी बुवा, तुमचे अधिकारी, उपाधिकारी, तसेच तुमचे मंत्री-संत्री सर्वजण हजर हायेत ?

प्रधानजी : होय महाराज, सर्वजण लवकरच उपस्थित राहतील, तेव्हा आपण सिंहासनावर विराजमान व्हावे महाराज.

आपल्या डमडम नगराच्या गादीवर स्थानापन्न झालेले नवे महाराजे ससाजी यांच्या आज्ञेवरून मी असे जाहीर करतो की, ज्यांच्या कोणाच्या तक्रारी, गाऱ्हाणी वगैरे असतील त्यांनी महाराजांसमोर हजर व्हावे.

दु. शिपाई : महाराजांचा जयजयकार असो. महाराज आपल्या डमडम नगराचे सुप्रसिद्ध व्यापारी लल्लशेठ हे आपली अर्जी दरबारात रुजू करू इच्छितात.

ससाजी : ठीक आहे. त्यांना आमच्यासमोर हजर करा.

दु. शिपाई : लल्लूशेठ मख्खनचाट दरबार में हाजीर हो ... !
लल्लूशेठ मख्खनचाट दरबार में हाजीर हो ... !

शेठजी (तेवढ्यात ढेरीवर हात फिरवीत शेठजीचा प्रवेश) : जी महाराज मैं दरबारमें हाजीर हूँ। ठाकूर महाराजीको प्रणाम, प्रणाम। मै लूट गयो महाराज मैं लूट गयो। (ससाजीचे हात-पाय चेपीत,) महाराज मा को न्याय करो महाराज, मा को न्याय करो, अपनी फिर्याद करो महाराज, था को ये प्रधानजीने मा को दस बीगा जमीन देनी थी, और मारकूनी पचास हजार मोहरा लेली. पर मुझे ना दस बीगा जमीन दी, ना मारो पचास हजार मोहरा वापीस दी. था को प्रधानजीने मा को फसाया महाराज, मा को न्याय करो महाराज, मा को न्याय करो !

ससाजी : (डोके खाजवत) आँ? शिपाई, परधानजी बुवान् इरुद्ध कायेतरी तक्रार दिसते तेव्हा शेठजी काय म्हणतात ते आम्हाला नीट समजावून सांगा.

दु. शिपाई : महाराज या शेठजीचे म्हणणे आहे की, आपल्या प्रधानजीने शेठजीकडून पन्नास हजार मोहरा घेऊन त्यांना दहा एकर जमीन देतो म्हणाले. परंतु अजून शेठजींना जमीन पण मिळाली नाही अन् शेठजींकडून घेतलेल्या पन्नास हजार मोहरापण शेठजीला परत दिल्या नाहीत.

ससाजी : काय म्हणालात ? पन्नास हजार मोहरा परधानजीने शेठजी-कडून घेतल्या अन् शेठजीला दहा एकर जिमीन देतो म्हणाले ? (प्रधानजीकडे पाहात) परधानजी !

प्रधानजी (घाबरून) : हरी... हरी... ! हरी... हरी... !

ससाजी : खामोश ! तुम्ही शेठजींकडून कोणाला विचारून पैसे घेतले आणि कुटली जिमीन देणार व्हता तुम्ही शेठजीला ? असले काळे धंदे कव्हापासून करता ?

प्रधानजी (घाबरून) : हरी... हरी... ! हरी ... हरी ... !

ससाजी : खामोश !

प्रधानजी : महाराज, मला क्षमा करावी महाराज मी... मी...

ससाजी : एक शबुद बी बोलू नको, तुम्हाला या सर्व्या वाईट कृत्या-बद्दल शिक्षा भोगावी लागेल. आतापर्यंत कित्येक काळेबाजार केले असतील तुमी कोणास ठाऊक ? शिपाई यांना घेऊन जा आणि तुरुंगात डांबून ठेवा. त्याशिवाय हे सुधारणार न्हाईत.

दु. शिपाई : महाराज गुन्हेगारांना वेळेवर आपल्या दरबाराच्या रिवाजा-नुसार शिक्षा न दिल्या गेल्यामुळे तुरुंग अगदी गुन्हेगारांनी गच्च भरले आहेत. तेव्हा तुरुंगांत जागा शिल्लक नाही.

ससाजी : गुन्हेगारांना शिक्षा न झाल्यामुळे तुरुंग गच्च भरला आहे ? तर मग असं करा, त्या सर्व गुन्हेगारांना आमच्या समोर हजर करा. त्यांनी काय गन्हा केलाय ? त्यांना कशासाठी तुरुंगात डांबून ठेवले याची आम्हाला चौकशी करायची हाये आणि ह्ये परधानजी बुवांनाही घिऊन जा आणि तुरुंगात डांबून ठिवा. म्हंजी चांगली अद्दल घडेल.

प्रधानजी : हरी ... हरी ! हरी... हरी !

(असे म्हणत असतानाच प्रधानजीला शिपाई पकडून घेऊन जातात.)

ससाजी (शेठजीकडे पाहात) : आणि या शेठजीकडे पन्नास हजार मोहरा आल्या कुठून ? यानं मालामध्ये भेसळ केली असेल, नाहीतर माल दुप्पट भावाने काळ्याबाजाराने लोकांना इकला असेल. त्याशिवाय यवढं पैसं याच्याकडे आलंच कुठून ?

शेठजी (घावरत) : नई, नई, महाराज मैने ऐसा नही किया।

ससाजी : खामोश !

(तेवढ्यात पहिला शिपाई प्रवेश करतो.)

प. शिपाई : महाराज तुरुंगातील सर्व गुन्हेगारांना आपल्या दरबारा-बाहेर उभे केले आहे.

ससाजी : ठीक हाये. एक एक गुन्हेगाराला आमच्यासमोर उभं करा.

आणि ह्यो शिपाई, या शेठजीला त्येच्या निवासस्थानावर घेऊन जा आणि त्येच्या निवासस्थानाची कसून झडती घ्या. मग पुढची कायद्यानुसार कारवाई करा.

शेठजी : नई. नई महाराज-- ये आप क्या करे महाराज, ये आप क्या करे... ?

(पहिला शिपाई शेठजीला ओढत घेऊन जातो. तोच दुसरा शिपाई एका वयस्कर म्हाताऱ्या गृहस्थाला घेऊन येतो.)

दु. शिपाई : महाराज, ह्या म्हातारबाबांनला-लाकूडतोड्याला चोरीच्या आरोपाखाली आज दहा वर्षे तुरुंगवास भोगावा लागत आहे.

ससाजी (दचकून पाहतो.) : कोण ? आजोबा ? आजोबा तुम्ही ?

(धावत जाऊन म्हाताऱ्याला मिठी मारतो.)

म्हातारा : आरं पन तू कोन रं बाबा ? म्या वळिकलं नाहृय तुला.

ससाजी : असं काय करताय आबा ? मी तुमचा ससाजी हाय ससाजी.

म्हातारा : कोन ? ससाजी तू ? अन् इथं कसं काय ? मी सपान बिपान तर न्हाय बघत. अन् तू हे कसलं स्वांग घेतलंय ?

ससाजी : हे स्वांग नाही, आता मी या डमडम नगराचा राजा झालोय राजा !

म्हातारा : पर काय रं ? हे सगळं कसं काय घडलं ?

ससाजी : आबा ते लय मोठं रामायण हाये. पहिल्यांदा तुम्ही जरा विश्रांती घ्या. मग निवांत सगळं सांगतो तुमाला. शिपाई, आमच्या आबांना न्हाण्याची आनि खाण्यापिण्याची सगळी यवस्था करा जा !

दु. शिपाई : जशी महाराजांची आज्ञा !

(शिपाई आदरपूर्वक आजोबांना घेऊन जातो.)

प. शिपाई (मसाजीला घेऊन प्रवेश करतो ) : महाराज हा तिसरा आरोपी, याचे नाव आहे मसाजी.

मसाजी (दचकून) : काय मसाजी... ?

(दोघेजण धावत येऊन एकमेकांना मिठी मारतात.)

आरे मसाजी, यवढ्या दिवस कुठं हुतास ? मी तुला खूप खूप शोधलं रे ! पर तुझा काय पत्त्याच न्हाय ! अन् इकडं या चक्रमसिंह म्हाराजांना जाव विचारायला आलो तर भलतंच घडलं.

मसाजी : भलतंच घडलं ? काय घडलं ? अन् हा कसला अवतार धारण केलास ?

ससाजी : ते तुला मी नंतर सांगतो, आधी तू मला सांग की ऱ्हा त्या चक्रमसिंह महाराजांनी कडेलोटाची शिक्षा फर्मावली होती ना ? मग तू इथं कसा काय ?

मसाजी : आरं तुला ठावं नाही काय, आपल्या दरबाराचा गोंधळी कारभार ? त्या परधानजीबुवांनी म्हाराजांना सांगितल्यापर-मानं कधी काम केलं काय ? मला कडेलोटाची शिक्षा करायची सोडून त्यांनी मला तसंच तुरुंगात डांबून ठिवलं. का तर म्हणे दरबारातले शिपाई रजेवर गेले. पण सश्या तू हा कसला अवतार धारण क्येलास ?

ससाजी : ये, ये बेटच्या नीट बोल, या सर्व्या लोकांसमोर आणि आमच्या राणीच्या देखत आमचं क्रेडीट डाऊन करतो काय ? बेटच्या मला या डमडम नगराचा राजा म्हनत्यात राजा !

मसाजी : काय म्हनतो, राजा ? अरे जा. म्हणे राजा.

ससाजी : तुला खोटं वाटतं का ? तर बघ आता गंमत (शिपाईला बोलवतो.) शिपाई.

प. शिपाई : आज्ञा असावी महाराज !

ससाजी : ताबडतोब आपल्या डमडम नगरातील रहिवाशांना दवंडी पिटवून जाहीर करा की, आजपासून आपल्या डमडम नगराचे नवे परधानजी मसाजी झाले हायेत. जा लवकर दवंडी पिटवा.

प. शिपाई : जशी आपली आज्ञा महाराज ! (निघून जातो.)

आवाज : ऐका हो .. ऐका ! डमडम नगराचे महाराजे ससाजी यांच्या आज्ञेवरून सर्वांना कळविण्यात येते की, आपल्या डमडम

नगराचे नवे प्रधानजी ' मसाजी ' झाले आहेत हो... !

(वरील दवंडीचा आवाज ऐकू येत असतानाच एक शिपाई ' मुकूट ' घेऊन येतो आणि ससाजीच्या हातात देतो. ससाजी मुकूट घेऊन मसाजीच्या डोक्यावर घालतो.)

ससाजी : मसाजी आजपासून तुम्ही या डमडम नगराचे परधानजींचे पद सांभाळून राज्यकारबाराकडे येवस्थीत लक्ष ठिवा. समजलं परधानजी...

मसाजी (स्वत:च्याच मूडमध्ये आहे.)

ससाजी (जोरात ओरडून) : परधानजी...

मसाजी : काय रं सश्या, काय झालं ?

ससाजी : काय म्हणालास ?

मसाजी : चुकलो, बोला ससाजीम्हाराज काय आज्ञा हाये ?

ससाजी (थाटात) : उद्या आम्ही डमडम नगरात हिंडून तेथील लोकांच्या काय गैरसोयी हायेत, तसेच राज्यात काय अडचनी हायेत त्ये आम्ही परत्यक्ष जाणून घेणार हाओत. तेव्हा उद्याची निघण्याची येवस्था करा. समजलं ?

(असे म्हणत निघून जातो.)

मसाजी : पाहिलं का मंडळी या सश्याचा थाट ? (दाताखाली जीभ चावत)

चुकलो, आमच्या ससाजी म्हाराजांचा थाट, राज्याचा कारबार हातात घिऊन चार दिवस पण झाले न्हाय तर लगेच लागला राज्यकारबार सांभाळायला. पण मंडळी तुमी काय बी म्हना, राजा असावा तर असा ! आता तुमीच पाहिलं, चक्रमसिंह राजाच्या राज्यामध्ये किती गोंधळ माजला व्हता. पण या आमच्या ससाजी महाराज राजे झाल्यापासून सगळं कसं जितल्या-तितं. सगळीकडे परजा आता आनंदात नांदती हाये.

बरं तर मंडळी मला ससाजी म्हाराजांच्या आज्ञेवरून त्येंची उद्याची तयारी करायला पाहिजे. तुम्हाला पण उशीर झालेला दिसतोय तर मग आता मी लागतो माझ्या कामाला.

# प्रवेश सहावा

(चक्रमसिंह महाराज दरबारामध्ये येरझाऱ्या घालीत आहेत. ते फारच बेचैन अवस्थेत दिसतात. तेवढ्यात दासी प्रवेश करते.)

दासी : चक्रमसिंह महाराजांचा जय जयकार असो ! महाराज आपल्या राजकन्या एकट्याच छोट्या राजकुमारांच्या शोधास निघाल्या आहेत.

चक्रमसिंह . काय ? तुम्ही तावडतोब जा आणि त्यांना दरबारात पाठवून द्या.

दासी : जशी महाराजांची आज्ञा !

(दासी जाते, तोच ससाजी आणि मसाजी प्रवेश करतात.)

ससाजी }<br>मसाजी } : म्हाराजांचा विजय असो !

ससाजी : म्हाराज आपण खूपच चिंतातूर दिसत आहात !

चक्रमसिंह : त्या डमरू राक्षसाच्या साथीदारांनी छोट्या राजकुमाराला अजूनही मुक्त केले नाही. तीच च्चिंता लागली आहे. (तेवढ्यात राजकन्या व दासी प्रवेश करतात.)

राजकन्या : बाबा, आता मी तुमचं काही एक ऐकणार नाही. मी माझ्या विक्रमभाऊला त्या राक्षसाच्या तावडीतून मुक्त केल्याशिवाय तुम्हाला तोंड दाखविणार नाही. (जाऊ लागते– तोच ससाजी राजकन्येला आडवतो.)

ससाजी : अहो थांबा, तुमी एकटं त्या घनदाट जंगलात जाणं बरोबर न्हाई.

राजकन्या : तर मग काय करू ? तुमच्याप्रमाणे येथे न्यायनिवाडा करीत बसू ? किती तरी दिवस झाले माझा भाऊ माझ्यापासून दूर आहे. पण तुमाला त्याची काय फिकीर ? तुम्हाला आता राज्य मिळालंय ना ? मग बसा तुम्ही इथे न्यायनिवाडा करीत. मी मात्र आता शांत बसणार नाही.

ससाजी : छोटचा राणीसाहेबा, आमाला राज्य मिळालंय, आमी या नगराचे राजे हाओत. म्हणूनच पहिल्यांदा परजेच्या गैरसोयी दूर करणे आणि त्यांना योग्य न्याय देणे हे माझे जसे कर्तव्य आहे, तसेचं आपल्या छोटचा राजकुमाराला त्या डमरू राक्षसाच्या तावडीतून मुक्त करणे हे देखील माझं कर्तव्य आहे.

मसाजी : बरोबर आहे, काही झालं तरी आमी त्या डमरू राक्षसाच्या तावडीतून छोटचा राजकुमाराला सोडवून आणू.

ससाजी : परधानजी

मसाजी : आज्ञा असावी म्हाराज !

ससाजी : आपल्याला छोटचा राजकुमाराला डमरू राक्षसाच्या तावडी-तून मुक्त करण्यासाठी निघायचं आहे. तेव्हा निघण्याची तयारी करा

राजकन्या : मी सुद्धा येणार आहे तुमच्या बरोबर !

मसाजी : आवो, तुम्ही कशाला येता उगीचंच त्या डमरू राक्षसाच्या जंगलात ?

राजकन्या : ते काही नाही. मी येणार म्हणजे येणार !

चक्रमसिंह : ठीक आहे. चला आपण सर्वच जाऊ या. चला ...

(सर्वजण निघू लागतात– हळू हळू अंधार.)

## प्रवेश सातवा

(घनदाट जंगलाचे दृश्य, चार परदेशी मानवांच्या नजरकैदेत मध्यभागी राजपुत्र रडत बसला आहे. चौघेजण त्याची समजूत काढत आहेत.)

राजपुत्र (रडत) : तुम्ही खूप वाईट आहात, मला माझ्या बाबांकडे जोपर्यंत तुम्ही मला घेऊन जात नाही तोपर्यंत मी जेवणार नाही.

जपानी : वा रे वा हुशार ! अरे वेड्या तुझे वडील जोपर्यंत सरळ मार्गावर येणार नाहीत तोपर्यंत तू येथेच राहशील असा आमच्या डमरू राक्षसाचा हुकूम आहे.

रशियन : आम्ही तुला जर का तुझ्या वावांकडे नेले तर डमरू राक्षस आम्हाला जिवंत सोडणार नाही समजलं ?

जर्मन : आता तुझा हट्ट सोडून दे, आणि मुकाट्याने जेवण कर.

फ्रेंच : जर का तू जेवण केले नाहीस तर डमरू राक्षसाकडे आम्ही तुझ्याबद्दल तक्रार करू. मग ते तुला कधीच सोडणार नाहीत.

राजपुत्र (रडत) : नाही हो नाही, डमरू राक्षसाला सांगू नका, तुम्ही सांगाल त्याप्रमाणे मी वागेन.

(तेवढ्यात ससाजी, मसाजी, राजकन्या आणि चक्रमसिंह महाराज व दोन शिपाई सर्वजण लढाईच्या तयारीत हातात तलवारी घेऊन येतात.)

चक्रमसिंह : खामोश ! कोणीही जागचे हलू नका, नाहीतर प्राणाला मुकाल.

ससाजी : तुमीच का डमरू राक्षसाचे आज्ञाधारी सेवक ?


राजकन्या : चूपचाप माझ्या विक्रमभाऊला आमच्या हवाली करा.

जपानी : खबरदार पुढे याल तर ? डमरू राक्षसांच्या हुकुमाशिवाय आम्ही राजपुत्राला सोडणार नाही.

चक्रमसिंह (शिपायांना) : अरे गाढवांनो, असे पाहता काय ? कैद करा सर्वांना.

(शिपाई कैद करण्यास पुढे येतात तोच डमरू राक्षसाचे सेवक त्यांना जमीनदोस्त करतात. आणि लगेच चक्रमसिंह महाराज ससाजी व मसाजी यांना पकडून ठेवतात. तेवढ्यात डमरू राक्षसाचा आवाज ऐकू येतो.)

आवाज : (हासत) हा:... हा: हा:.. ! डमडम. डमरू··· ! डमडम... डमरू शाब्बास माझ्या मित्रांनो ! तुम्ही मला वचन



राजा चक्रमसिंह

दिल्याप्रमाणे तुम्ही तुमची कामगिरी बजावली आहे. मी तुमच्या बहादुरीवर खूष आहे.

चक्रमसिंह : अहो डमरू राक्षस ! मी तुम्हाला शरण आलो आहे. कृपा करून आता तरी माझ्या विक्रमाला मुक्त करा. मी तुमच्या सर्व अटी मान्य करायला तयार आहे.

आवाज : राजा चक्रमसिंहा ! तर शेवटी तू मला शरण आलास. ठीक आहे. राज्यकारभार ससाजीकडे सोपवून तू खूप चांगले काम केले आहेस. कारण राज्यकारभार सांभाळण्यास कर्तृत्व लागते. ते तुझ्याजवळ नाही. तू फक्त अंधश्रद्धेवर विश्वास ठेवून देव-श्रद्धाळू बनून उगीचंच वेळ आणि पैसा व्यर्थ घालवत होतास. आता ससाजीसारखा मानवतावादी राजाच प्रजेचे भले करू शकेल असा मला आत्मविश्वास आहे. आता सर्वकाही माझ्या मनासारखे झाले आहे. तेव्हा तुम्ही तुमच्या राजपुत्राला घेऊन जाऊ शकता.

चक्रमसिंह : डमरू राक्षस ! खरं म्हणजे तुमच्यामुळेच मी वेळेवर जागा झालो. नाहीतर सर्व राज्याचे फार नुकसान झाले असते आणि त्याला जबाबदार मी होतो. पण तुमच्यामुळेच आणि ससाजी-मुळे मी भानावर आलो. त्यामुळे मी तुमचा खूप आभारी आहे. ससाजीसारखा राजा मिळाल्यामुळे माझी एक चिंता तर दूर झाली, आता मी आमच्या कन्येचा हात ससाजीच्या हातात देऊन दुसरी चिंताही दूर करणार आहे.

(ससाजी गडबडतो. राजकन्या लाजते. चक्रमसिंह महाराज राजकन्येचा हात ससाजीच्या हातात देतात.) बोला शुभमंगल... (सर्वजण टाळ्या वाजवतात. ससाजी व राजकन्येच्याभोवती परदेशी मानव व दरबारातील शिपाई सर्वजण फेर धरून आनंदाने नाचू लागतात. तोच डमरू राक्षसाचा आवाज ऐकू येतो.)



आवाज : वा... वा... छान ! चक्रमसिंह राजे तुम्ही तर खूपच हुशार निघालात. एकाच दगडात दोन पक्षी मारलेत. ससाजीला तुम्ही जावईबापू बनवून तुमची दुसरी चिंताही दूर केली. आता तुम्हाला कसलीच काळजी उरली नाही.

माझ्या परदेशी मित्रांनो, तर आता चला, आपले येथील सर्व कार्य ठरल्याप्रमाणे पार पडले आहे. ससाजी येथील सर्व कारभार व्यवस्थित सांभाळेल, त्यामुळे येथील सामान्य गरीब प्रजाही आनंदात राहील. तेव्हा आता आपल्याला निघायला हवं.

ससाजी : काय ? डमरू राक्षस तुम्ही निघालात ? अहो तुमच्या प्रोत्साहनामुळे तर मी एवढी मोठी बाजी मारली, आणि पुन्हा तुम्ही मला सोडून जाणार ? नाही नाही. मी तुम्हाला जाऊ देणार नाही.

चक्रमसिंह : खरोखरच तुम्ही जाऊ नका, तुम्ही तुमच्या परदेशी मानवां-बरोबर येथेच रहा, तुम्हाला येथून पुढे काहीही त्रास होणार नाही.

आवाज : मित्रांनो, तुम्ही सर्वजण माझा आदर करता, मी तुमचा सर्वांचा आभारी आहे, पण मला येथून निघालंच पाहिजे. मला लोककल्याणासाठी सर्व जग हिंडायचं आहे. प्रत्येक मानवाचे दु:ख नष्ट करून सुखाचा मार्ग त्याला दाखवून द्यायचा आहे. तेव्हा आम्हाला निघायलाच पाहिजे

मित्रांनो आता आपल्याला निघायला हरकत नाही.

चौघेजण : जशी आपली आज्ञा महाराज !

(सर्वजण मिळन घोषणा देतात.)

ससाजी : डमरू राक्षस...

सर्वजण : झिंदाबाद !

ससाजी : डमरू राक्षस...

सर्वजण : झिंदाबाद !

ससाजी : डमरू राक्षस

सर्वजण : झिंदाबाद !

(घोषणा देत असतानाच चार परदेशी मानव रंगमंचावरून प्रेक्षकगृहातून घोषणा देत निघतात. डमरू राक्षस अदृश्य होतो. जर राक्षसाचे पात्र असेल तर त्यालाही प्रेक्षकगृहातून बाहेर पाठवणे, स्लाइडवर राक्षस दाखवला तर तो अदृश्य करणे. रंगमंचावरून चार परदेशी मानवांना ससाजी, राजकन्या व इतर सर्वजण टाटा करीत असतानाच पडतो.)

※ ※

BVBK-0402689

दिनांक